**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००८/ ३०२२ /०२**

**श्री.नरवंदा प्रसाद मिश्रा,**
**राजीव गांधी मेमोरियल हायस्कूल,**
**नर्मदा कृष्णा भवन, परेरा वाडी,**
**साकीनाका, मुंबई** ------- **अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त,**
**परिमंडळ - ९ ,बांद्रा (प) मुंबई- ४०० ०५०.**

**जनमाहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक पोलीस आयुक्त(नियंत्रण कक्ष )**
**पश्चिम प्रादेशिक विभाग, कार्टर रोड,**
**बांद्रा (प) मुंबई- ४०० ०५०.** ------- **उत्तरवादी**

**-विवेचन-**

श्री.नरवंदा प्रसाद मिश्रा,मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दाखल केलेल्या व्दितीय अपीलावर दिनांक १३/१०/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीला जनमाहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

चूकीची व अपूर्ण माहिती दिली, प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी दिलेल्या माहितीची सत्यता पडताळून पाहिली नाही, त्यांनी जनमाहिती अधिकारी व पोलीस उपनिरीक्षक यांना संरक्षण देण्याच्या / वाचवण्याच्या दृष्टीने आदेश पारित केले. या कारणास्तव अपीलकाराने आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

उपस्थिताचे म्हणणे ऐकल्यानंतर व उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर खालील बाबी स्पष्ट झाल्या.

परेरावाडी, साकी नाका मुंबई येथील डिसोझा चाळीमध्ये एकूण १५ खोल्या असून त्यापैकी ३ खोल्यामध्ये राजीव गांधी मेमोरियल हायस्कूलचे वर्ग आहेत.राजीव गांधी मेमोरीयल हायस्कूलचे प्राचार्य श्री.मिश्रा व डिसोझा चाळीच्या मालकाचे जावई श्री. झालके यांचा जागेसंबंधी दिवाणी दावा दाखल आहे. श्री. झालके यांच्या तक्रारीवरून साकी नाका पोलीस स्टेशनमध्ये श्री.मिश्रा यांच्या विरूद्ध गुरक्र २८८/०६ कलम ३४२ अन्वये पोलीसांनी गुन्हा नोंदवला आहे. श्री. मिश्रा यांच्या मते श्री.झालके हेच खरे आरोपी असून त्यांना पोलीसांकडून संरक्षण दिले जात होते. तथापि श्री. मिश्रा यांच्या तक्रारीनुसार नंतर

पोलीसांनी श्री.झालके यांच्या विरुद्धही गुन्हा दाखल केला. श्री. मिश्रा यांच्याविरूद्ध नोंदवलेला गुन्हा खोटया तक्रारीवर आधारित असल्यामुळे तो गुन्हा ब वर्गीकृत केला गेला. ब वर्गीकृत केलेला गुन्हयाचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्याची आवश्यकता नाही असे कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि श्री. श्रीकांत बोरसे,सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी दोषारोपपत्र दाखल करण्याचे तोंडी विधीमत/ अभिप्राय दिल्याचे कारण नमूद करून पोलीसांनी श्री.मिश्रा व श्री.झालके या दोघाविरूद्धचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

जनमाहिती अधिका-यांनी साकीनाका पोलीस स्टेशनकडून उपरोक्त गुन्हयाच्या न्यायालयात दाखल केलेल्या दोषारोपपत्राव्यतिरिक्त इतर सर्व कागदपत्रे अपीलकाराला दिली आहेत.सदर गुन्हयाच्या तपासकामी केलेल्या कार्यवाहीचा संपूर्ण तपशील दिलेला आहे. श्री.मिश्रा यांच्याविरूद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेले असल्यामुळे ते त्यांना न्यायालयात उपस्थित झाल्यानंतर न्यायालयाच्या परवानगीने देता येईल असे जनमाहिती अधिका-यांनी नमूद केले आहे.व्दितीय अपीलामध्ये अपीलकारावरचे गुन्हयाचे ब वर्गीकृत करण्याबाबत दिलेली चूकीची माहिती व गुन्हा ब वर्गीकृत करण्यासाठीचे नोटींग व प्रोसीडींग च्या प्रती मिळाव्यात हे दोन महत्वाचे मुद्दे आहेत.

एकंदर सर्व प्रकरणाचा साकल्याने विचार करता, गुन्हयाबाबतची कार्यवाहीबाबतची माहिती,गुन्हा ब वर्गीकृत करण्याबाबतची टिप्पणी(टिप्पणी प्रस्तावासह) ही माहिती अपीलकाराला दिलेली आहे. दोषारोपपत्र अर्जदार न्यायालयात उपस्थित झाल्यानंतर मिळणार आहे. थोडक्यात मागितलेली माहिती अपीलकाराला मिळालेली आहे व उर्वरित माहिती न्यायालयात उपस्थित झाल्यानंतर मिळणार आहे.

मात्र श्री. श्रीकांत बोरसे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी अर्जदाराचे विरूद्ध दोषारोपपत्र दाखल करण्याचे अभिप्राय दिल्यामुळे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले ही चूकीची माहिती अपीलकाराला देण्यात आली आहे कारण श्री. श्रीकांत बोरसे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी उपरोक्त गुन्हयासंदर्भात असा कोणताही तोंडी अभिप्राय पोलीस स्टेशनला दिला नसल्याचे लेखी दिले आहे.

सबब ही चूकीची माहिती दिल्याबद्दल जनमाहिती अधिका-यांनी त्यांच्यावर अधिनियमातील तरतूदीनुसार शास्ती का लादण्यात येउ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आंत पोस्टाने/ हँड डिलीव्हरीने व आयोगाकडे दि.३१ डिसेंबर, २००८ रोजी सकाळी ११.०० वाजता व्यक्तिशः

येउन खुलासा सादर करावा, असे आदेश देण्यात येत आहेत. दोषारोप पत्रं कोर्टाकडून अर्जदारास मिळेलच. अर्जदाराने पाठविलेल्या माहितीपैकी जी उर्वरित माहिती अजून दिली नसेल ती ५ दिवसाचे आंत देण्यांत यावी व तसा अहवाल आयोगास पाठवावा.

## निर्णय

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई,**
**दिनांक ०३/१२/२००८**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००८/तक्रार-६३२/०२**

**श्रीमती योगिता चव्हाण,** **------ तक्रारदार**
**१०३-अे, कृष्ण चेंबर,**
**५९ न्यु मरिन लाईन्स,मुंबई- ४०० ०२०.**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा**
**पोलीस आयुक्त कार्यालय, कोर्ट नाका,ठाणे.** **------- उत्तरवादी**

## - विवेचन -

तक्रारदार श्रीमती योगिता चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ (१) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३.८.२००७ रोजी तक्रार दाखल केली. अपिलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि. १६.६.२००७ रोजी अर्ज करुन, दि.१९.५.२००७ च्या पत्रावर केलेल्या चौकशी अहवालाची प्रत मागितली होती.

दिनांक १९.५.२००७ रोजीच्या तक्रार अर्जाची चौकशी नारपोली पोलीस ठाणे येथे चालू आहे. सदर अर्जाची चौकशी चालू असल्याने कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल झालेला नाही. अर्जातील चौकशी पूर्ण होताच माहिती देण्यात येईल. याकरिता आणखी एक महिना तरी अवधी लागेल. आपण अर्ज चौकशीस वेळोवेळी सहकार्य केल्यास चौकशी लवकर होण्यास मदत होईल असे जन माहिती अधिका-यांनी दि.१.८.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.१७.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यानी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने केलेल्या तक्रार अर्जाची चौकशी पोलीस निरीक्षक, पी.डी.परदेशी, प्रशासन व जनसंपर्क, नेमणूक नारपोली पोलीस ठाणे हे करीत असून, त्यांनी गोडाऊनला भेट दिली आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल होतो किंवा नाही याबाबत सात दिवसांत निर्णय घेऊन अपिलकारास कागदपत्राच्या प्रती देण्यात याव्यात असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. त्यानुसार जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. २१.९.२००७ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली.

तक्रारदाराने ३० दिवसाच्या आत जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि. १५.१०.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची व जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी सादर केलेल्या लेखी अहवालाची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि. १६.६.२००७ रोजी अर्ज करुन, दि.१९.५.२००७ च्या पत्रावर केलेल्या चौकशी अहवालाची प्रत मागितली होती. तक्रारदराने श्री.विनय मलिकराज वालिया यांना भिवंडी येथील गोडाऊन रु.५.०० लाख किंमतीत विक्री केले. गैरअर्जदार यांनी दिलेला रु.५.०० लाखाचा धनादेश वटला नसल्याने फसवणूक झाल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने गैरअर्जदाराविरुध्द तक्रार दाखल केली. तक्रारदाराने गैरतक्रारदाराच्या नावावर गोडाऊन करुन न दिल्यामुळे गैरतक्रारदार यांनी रु.५.०० लाखाचा धनादेश स्टॉप पेमेंट करण्याकरिता बँकेत कळविले. गोडाऊन गैरतक्रारदार यांच्या नावावर न झाल्याने तक्रारदार व गैरतक्रारदार यांच्यामध्ये वाद निर्माण झाला. त्यामुळे सदर प्रकरणात ट्रेसपासचा गुन्हा होत नाही. गोडाऊन गैरतक्रारदाराच नावावर करुन न दिल्यामुळे तक्रारदार व गैरतक्रारदार यांच्यामध्ये वाद निर्माण झालेला आहे. सदर बाब ही आता दिवाणी स्वरुपाची झालेली आहे असे जन माहिती अधिका-याने अपिलकारास दिलेलया माहितीवरुन दिसून येते. तक्रारदाराने मागितलेल्या माहितीचे स्वरुप हे चौकशीसंबंधीचे असल्याने तक्रारदारास माहिती देण्यास जन माहिती अधिका-यांनी जाणूनबुजून विलंब केला असे म्हणता येणार नाही. सदर प्रकरणी तक्रारदारास हवी असलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी दिली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ.सुरेश जोशी )**
**मुख्य राज्य माहिती आयुक्त**

**मुंबई,**
**दिनांक ०३/१२/२००८**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००८/३१४१ /०२**

**श्री.एडविन एफ. ब्रिटो,**
**१०६, जो-तेस हाउस,झेन व्हिलाच्या पाठीमागे,**
**जुने खार व्हिलेज,खार (प)मुंबई.** **------- अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त,**
**परिमंडळ-९ ,बांद्रा (प) मुंबई- ४०० ०५०**

**जनमाहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक पोलीस आयुक्त(नियंत्रण कक्ष )**
**पश्चिम प्रादेशिक विभाग, कार्टर रोड,**
**बांद्रा (प) मुंबई- ४०० ०५०.** **------ उत्तरवादी**

**-विवेचन-**

श्री.एडविन एफ. ब्रिटो, मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपीलाची दिनांक १७/१०/२००८ रोजी सुनावणी आयोजित केली होती. सुनावणीला अपीलकार व जनमाहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलकारांनी एम.आर.टी.पी.१९६० अन्वये एच/वेस्ट वॉर्ड, मुंबई महानगरपालिका यांनी अनधिकृत बांधकामाबाबत खार पोलीस स्टेशनमध्ये दाखल केलेले एफ. आय.आर./तक्रारी,त्यावर खार पोलीस स्टेशनने केलेली कार्यवाही, किती प्रकरणामध्ये खटले दाखल झाले, आरोपितांची नांवे,पत्ता अशा स्वरूपाची माहिती मागितली होती.जनमाहिती अधिका-यांनी खार पोलीस स्टेशनकडून माहिती प्राप्त करून घेउन ती अपीलकाराला दिली.सदर माहिती पूर्ण नसल्यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी सुनावणी घेतली व अपीलकाराने मागितलेली सर्व माहिती जनमाहिती अधिका-यांनी दयावी असे आदेश पारित केले.आदेश पारित केल्यानंतर जनमाहिती अधिका-यांनी अपीलकाराला पुन्हा माहिती दिली. तथापि अपीलकाराच्या म्हणण्यानुसार जनमाहिती अधिका-यांनी त्यांना मागितलेल्या माहितीच्या केवळ ५ टक्के च माहिती दिली आहे.प्रथम अपीलीय प्राधिका-यांच्या आदेशानंतरही जनमाहिती अधिका-यांनी पूर्ण माहिती न दिल्यामुळे त्यांनी पूर्ण माहिती मिळावी, जनमाहिती अधिका-यांवर अधिनियमातील तरतूदीनुसार दंडात्मक कार्यवाही करावी व माहितीच्या अधिकार

अधिनियमाचे उल्लंघन केल्यामुळे जनमाहिती अधिका-यांना सक्त ताकीद देण्यात यावी, यासाठी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

जनमाहिती अधिका-यांनी आयोगाला सादर केलेल्या खुलाशानुसार माहितीमध्ये समाविष्ट असलेले काही गुन्हे तपासाधीन व काही गुन्हे न्यायप्रविष्ट असल्याने अधिनियमाच्या कलम ८(ख) व ८(ज) नुसार तर अटक आरोपितांचे नांवे व पत्ता कलम ८ (ज) नुसार अशी माहिती नाकारली आहे. आरोपितांचे नांव व पत्ते अपीलकाराला कळावे यासाठी जनमाहिती अधिका-यांनी अपीलकाराला मुंबई महानगरपालिकेकडून प्राप्त झालेल्या नोटीसांच्या छायांकित प्रती दिल्या आहेत. जनमाहिती अधिका-यांनी वर नमूद तपासाधीन व न्यायप्रविष्ट गुन्हयाच्या माहितीखेरीज इतर सर्व माहिती अपीलकाराला दिली आहे.

जनमाहिती अधिका-यांनी न्यायप्रविष्ट व तपासाधीन प्रकरणाची माहिती नाकारली आहे. तपासाधीन प्रकरणाची माहिती दिल्यास तपासामध्ये परिणाम होऊ शकतो हे एक वेळ मान्य करता येईल. पण जेथे दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे, अशा ा ८ गुन्हयासंबंधीचे अर्जदारानी मागितलेले कागदपत्र देण्यास कोणतीही हरकत नाही. तेव्हा हे कागदपत्र अर्जदारास विनामूल्य आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांनी द्यावेत.

## निर्णय

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**जन माहिती अधिका-यांनी उपनिर्दिष्ट कारवाई विहित मुदतीत करावी.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक १५/१२/२००८.**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**रामाआ/ अपील क्रमांक ३३७७/०२**

**श्री. संजय विष्णू टिकम,**
**बी/६०२, संस्कार,गणेश पेठ लेन,**
**दादर (प) मुंबई- ४०० ०२८** **-------अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा (पूर्व ) मुंबई- ४०० ०५१**

**जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पूर्व ) मुंबई- ४०० ०५१** **--------उत्तरवादी**

## -विवेचन-

श्री.संजय विष्णू टिकाम, मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खाली झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कामकाजासंबंधी प्राधिकरणाची परिपत्रके, मार्गदर्शक सूचना, इ.संबंधीची माहिती मिळण्यासाठी जनमाहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता.जनमाहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने व प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी आदेश दिल्यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपीलकाराने आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले ज्याची दिनांक२८/११/२००८ रोजी सुनावणी आयोजित केली होती.सुनावणीला अपीलकार उपस्थित होते. उत्तरवादी उपस्थित नव्हते.

झोपडपट्टी पुनर्वसनाचे कामकाज ज्या परिपत्रकांच्या,मार्गदर्शक सूचनांच्या आधारे चालते अशा कागदपत्रांच्या/ परिपत्रकांच्या प्रतीची अपीलकाराने जनमाहिती अधिका-यांकडे माहिती मागितली होती.जनमाहिती अधिका-यांनी एका पत्रान्वये माहिती तयार असून ती कार्यालयातून घेउन जावी असे अपीलकाराला कळवले व दुस-या पत्रान्वये अपीलकाराने त्यांना हवी असलेली माहिती मिळण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची माहिती पुस्तिका खरेदी करावी असे कळविले. प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी प्रथम अपीलावर सुनावणी घेउन जनमाहिती अधिका-यांनी अपीलकाराला मार्गदर्शक पुस्तिका व पुस्तिकेत समाविष्ट नसलेली परिपत्रके पुरवावी असे आदेश पारित केले. सुनावणीचे वेळी जनमाहिती अधिका-यांनी अशी माहिती अपीलकाराला पुरविण्याचे मान्य केले. मात्र अपीलकाराला माहिती पुरवली नाही.त्यामुळे अपीलकारांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केल्यानंतरही जनमाहिती अधिका-यांनी अपीलकाराला माहिती पुरवली नाही. ही गंभीर बाब आहे.विभागाची/ कार्यालयाची मार्गदर्शक पुस्तिका वा परिपत्रकाची माहिती देणे यासाठी अर्जदाराला व्दितीय अपील दाखल करावे लागते ही निश्‍चितच अनुचित बाब आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

जनमाहिती अधिका-यांनी अपीलकाराला हे आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसाच्या आंत प्राधिकरणाचे माहिती पुस्तक (मार्गदर्शक पुस्तिका) व कामकाजासंबंधीच्या परिपत्रकांच्या प्रती ही माहिती विनाशुल्क उपलब्ध करून दयावी.

अपिलीय अधिका-यांनी त्यांच्या दि.५.१०.२००७ रोजीच्या आदेशात माहिती पुरविण्यात यावी असे नमूद केले आहे. जरी किती दिवसांत माहिती द्यावी हे नमूद केले नसले तरी उशिरात उशिरा १०-१५ दिवसात ही माहिती उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे होती. आयोगाकडील दि. २८.१.२००८ रोजीच्या सुनावणीच्या दिवसापर्यंत अर्जदारास ही माहिती मिळाली नाही. सुनावणीसही झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे कोणीही उपस्थित राहीले नाहीत.

संबंधित जन माहिती अधिकारी यांनी सुरुवातीलाच म्हणजे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज आल्यानंतरच माहिती देणे आवश्यक होते. तसेही झाले नाही व प्रथम अपिलीय प्राधिका-यांच्या आदेशाचीही अंमजबजावणी झाली नाही. म्हणून माहिती देण्यात १०० दिवसांपेक्षा जास्त विलंब झाला असल्याने संबंधित जन माहिती अधिका-यावर रु.२५,०००/-ची शास्ती लादण्यात येत आहे. त्याची वसूली तीन समान मासिक हप्त्यात त्यांच्या पगारातून करण्यांत यावी व रक्कम शासनाच्या आदेशाप्रमाणे कोषागारात जमा करावी व चलनाच्या प्रती आयोगास पूर्तता अहवालाबरोबर पाठवाव्यात.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**वर नमूद केलेल्या आदेशाची पूर्तता करण्यांत यावी.**

**मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांनी वरील आदेशाप्रमाणे दंडात्मक कारवाईची पूर्तता करुन तसा अहवाल आयोगास सादर करावा.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक १५ /१२/२००८.**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ). अन्वये दाखल झालेले अपील**

**रामाआ/ अपील क्रमांक ३४७०/०२**

**श्री. जनार्दन वसंत पाटील,**
**सिताराम बिल्डींग,जी ब्लॉक,दुसरा माळा,**
**पलटण रोड, मुंबई- ४०० ००१** **------अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त,**
**परिमंडळ- २ मुंबई**

**जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**दक्षिण प्रादेशिक विभाग,मुंबई** **------ उत्तरवादी**

**-विवेचन-**

श्री. जनार्दन वसंत पाटील, मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत त्यांच्या अर्जित रजेचा अर्ज,धनार्जित रजा,ठाणे दैनंदिनीची प्रत, व काही कागदपत्रांवरील कार्यवाहीबाबत माहिती मिळण्यासाठी जनमाहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता. जनमाहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपीलकारांनी प्रथम अपीलीय प्राधिका-यांकडे अपील दाखल केले . प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशानंतरही देय असलेली माहिती मिळाली नाही या कारणास्तव त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले ज्याची दिनांक ८/१२/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीला अपीलकार व जनमाहिती अधिकारी उपस्थित होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, जनमाहिती अधिका-यांनी आयोगाला सादर केलेला लेखी खुलासा व उपलब्ध कागदपत्रे यांची तपासणी केल्यानंतर खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपीलकाराने केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिका-यांनी अपीलकाराला त्यांच्याकडे उपलब्ध कागदपत्रांची माहिती अपीलकाराला दिली . जी कागदपत्रे

पुढील कार्यवाहीसाठी अन्य कार्यालयाकडे गेली त्याचीही माहिती अपीलकाराला दिली. प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी  अपीलकाराला देय असलेली माहिती प्रशासकीय अधिकारी दक्षिण प्रादेशिक विभाग यांच्याकडून मागवून देण्याचे आदेश दिले. जनमाहिती अधिका-यांच्या लेखी खुलाशानुसार प्रशासकीय अधिकारी दक्षिण प्रादेशिक विभाग यांच्याकडून अपीलकाराला देय असलेली माहिती त्यांनी तयार केली आहे मात्र सदर माहिती घेउन जाण्यासाठी अपीलकार आले नाहीत. देय असलेली माहिती मिळाली नाही हा अपीलकाराच्या व्दितीय अपीलाचा मुख्य मुद्दा आहे.तथापि, अपीलकाराला अपेक्षित असलेली माहिती जनमाहिती अधिका-यांकडे तयार आहे.  अर्जदाराने त्यांच्या अर्जात त्यांना पोस्टाने माहिती पाहिजे किंवा ते स्वतः घेऊन जातील याचा उल्लेख केला नाही. सबब अपीलकाराने सदर माहिती जनमाहिती अधिका-यांकडून उपलब्ध करून घ्यावी.

**निर्णय**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक १५/१२/२००८.**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**रामाआ/ अपील क्रमांक-३२८७ /०२**

**श्री. किरण मनोहर शार्दुल,**
**लिपीक, प्र. स. (वि.सु.),कार्यालय,**
**वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई-३२** **----- अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,बँक ऑफ इंडिया इमारत,**
**महात्मा गांधी मार्ग, मुंबई- ४०० ००१**

**जनमाहिती अधिकारी तथा उपसचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,बँक ऑफ इंडिया इमारत,**
**महात्मा गांधी मार्ग, मुंबई- ४०० ००१** **------ उत्तरवादी**

## -विवेचन-

श्री.किरण मनोहर शार्दुल, मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत सहाय्यक पदासाठी लिपीकांची मर्यादित परीक्षा- २००४ या परिक्षेचा पेपर क्रमांक २ विभाग अ व ब मधील सर्व प्रश्नांचे विभागणीनुसार गुण, त्यांच्या पेपर क्रमांक २ च्या उत्तरपत्रिकेचे मॉडरेशन व त्यानुसार दिलेले गुण अशी माहिती मिळण्यासाठी जनमाहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता.जनमाहिती अधिका-यांनी माहिती नाकारल्यामुळे व प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी प्रथम अपील फेटाळल्यामुळे अपीलकाराने आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले ज्याची दिनांक २४/११/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती.सुनावणीला अपीलकार व जनमाहिती अधिकारी उपस्थित होते. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर तसेच जनमाहिती अधिका-यांनी सादर केलेली कागदपत्रे व उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर खालील बाबी स्पष्ट झाल्या.

दिनांक २३/१/२००५ रोजी घेतलेल्या सहाय्यक पदासाठी लिपीकांची मर्यादित परीक्षा- २००४ या परीक्षेत अर्जदाराला त्यांना पेपर क्रमांक २ च्या प्रश्नांची भागनिहाय गुणांची तसेच मॉडरेशन केले असल्यास गुण वाढले किंवा कमी झाले, मुख्य नियामकाकडून पुनर्नियमन करण्यात आले किंवा कसे याची माहिती जनमाहिती अधिका-यांकडून अपेक्षित होती. यापूर्वीही अर्जदाराने या परीक्षेच्या

त्यांच्या सोडवलेल्या उत्तरपत्रिकांची मागणी केली होती. सदर प्रकरणी (अपील क्रमांक २००७/१२३६/०२ ) आयोगाने उत्तरपत्रिका देण्याबाबत संस्थेवर सक्ती करता येणार नाही अशा स्वरूपाचे आदेश दिले आहेत. जनमाहिती अधिका-यांनी अपीलकाराला दिलेल्या उत्तरानुसार अपीलकाराने आताही अप्रत्यक्षरित्या उत्तरपत्रिकांचीच माहिती मागितली आहे.त्यांनी अपीलकाराला उपरोक्त आयोगाच्या आदेशाचा संदर्भ देउन ही माहिती नाकारली आहे. तसेच, प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी पायाभूत सुविधा व कर्मचा-यांची कमतरता या बाबी विचारात घेउन सदर माहिती अपीलकाराला देणे शक्य नाही असे आदेश पारित केले आहेत.

अपीलकाराने आता मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपीलकाराने अप्रत्यक्षरित्या उत्तरपत्रिकेचीच मागणी केली आहे. या जनमाहिती अधिका-यांच्या मतांशी आयोग सहमत आहे. अपीलकाराने मागितलेल्या माहितीचे स्वरूप पहाता ती देण्याबाबत जनमाहिती अधिका-यांना सक्ती करता येणार नाही. यापूर्वी आयोगाने दिलेल्या निर्णयामध्ये याअनुषंगाने आलेल्या बाबींचा उहापोह केलेलाच आहे.

वरील विवेचन लक्षात घेउन मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**निर्णय**

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक १५/१२/२००८.**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**रामाआ/ अपील क्रमांक ३२८८ /०२**

**श्री. किरण मनोहर शार्दुल,**
**लिपीक, प्र. स. (वि.सु.),कार्यालय,**
**वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई-३२** **------अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,बँक ऑफ इंडिया इमारत,**
**महात्मा गांधी मार्ग, मुंबई- ४०० ००१**

**जनमाहिती अधिकारी तथा उपसचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,बँक ऑफ इंडिया इमारत,**
**महात्मा गांधी मार्ग, मुंबई- ४०० ००१** **------उत्तरवादी**

## -विवेचन-

श्री.किरण मनोहर शार्दुल, मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत सहाय्यक पदासाठी लिपीकांची मर्यादित विभागीय परीक्षा-२००४ या परीक्षेच्या उत्तरपुस्तिकांच्या मॉडरेशनबाबत व उत्तरपुस्तिका प्रत्यक्ष तपासण्याचा कालावधी व विलंबाची कारणे यासंदर्भात काही मुद्दयांची माहिती मिळण्यासाठी जनमाहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता. जनमाहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी प्रथम अपील दाखल केले.प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी अपील फेटाळल्याने अपीलकाराने आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले ज्याची दिनांक २४/११/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीला अपीलकार व जनमाहिती अधिकारी उपस्थित होते. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर व उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर खालील बाबी स्पष्ट झाल्या.

जनमाहिती अधिका-यांनी अपीलकाराच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मॉडरेशन करण्यात आलेल्या उत्तरपत्रिकांची एकूण संख्या, नियमन करण्यात येणा-या उत्तरपत्रिकेंच्या संख्येबाबतचा आधार,नियमन करण्याबाबतचे सर्वसाधारण नियम, करण्यात आलेल्या पुनर्नियमनाबाबतची माहिती, नियमनाबाबतचे आयोगाचे अधिकार, उत्तरपुस्तिका तपासण्याचा कालावधी अशी माहिती अपीलकाराला

दिली आहे. अपीलकाराने प्रथम अपीलामध्ये नियमन केलेल्या उत्तरपुस्तिकांची प्रवर्गनिहाय संख्या, मॉडरेशनसाठीचे किमान गुण, परीक्षकांकडून तपासण्यात आलेल्या उत्तरपुस्तिकांची टप्पेनिहाय संख्या, याचे उदाहरण, प्रत्येक परीक्षकांकडून तपासण्यात आलेल्या उत्तरपुस्तिकेंची संख्या ,परीक्षकांनी तपासणीसाठी घेतलेला कालावधी अशा स्वरूपाची माहिती देण्याची विनंती केली आहे काही माहिती जनमाहिती अधिका-यांनी दिली असता उर्वरित माहिती मात्र पायाभूत सुविधा व कर्मचा-यांची कमतरता या कारणास्तव माहिती नाकारली आहे यामागे माहिती देण्यास टाळाटाळ करण्याचा हेतू आहे असे अपिलकाराने व्दितीय अपील दाखल करण्यामागचे कारण दिले आहे.

अपीलकाराने प्रथम अपीलामध्ये व व्दितीय अपीलामध्ये मागितलेल्या माहितीच्या मुद्दयांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की ही माहिती आकडेवारी स्वरूपाची आहे व एकूण माहितीतून ती वेगळी काढून दयावी लागणार आहे.थोडक्यात अपीलकाराला मुद्दयांच्या अनुषंगाने स्वतंत्र आकडेवारी तयार करून दयावी लागणार आहे.तसेच अपीलकाराने उदाहरणासह काही माहिती मागितली आहे. माहिती जशी आहे तशी देणे अधिनियमांतर्गत देणे अपेक्षित आहे. माहितीचे वेगळयाने वर्गीकरण करून देणे, उदाहरणासह स्पष्टीकरण देणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अपेक्षित नाही. सबब सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>निर्णय</u>**

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक १५ /१२/२००८.**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक रामाआ/ अपील क्र. ३४१२/०२**

**श्री. वजीर हुसेन शेख,**
**परमार नगर,एन-११३३,**
**फातीमानगर,पूणे-१३** **-------अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा**
**पोलीस उपमहानिरीक्षक (का.व सु.),**
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
**शहीद भगतसिंग मार्ग,कुलाबा,**
**मुंबई-४०० ००१**

**जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी,**
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
**शहीद भगतसिंग मार्ग,कुलाबा,मुंबई-४०० ००१.** **--------उत्तरवादी**

**- विवेचन-**

श्री. वजीर हुसेन शेख,पूणे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत त्यांच्याविद्ध दाखल प्रायव्हेट केसमधील चार्जशीट पाठवण्याच्या मंजूरीसंदर्भात काही माहिती मिळण्यासाठी जनमाहिती अधिका-यांकडे माहितीचा अर्ज केला होता.जनमाहिती अधिका-यांनी सदर माहिती नाकारल्यामुळे त्यांनी प्रथम अपीलीय प्राधिका-यांकडे अपील दाखल केले.प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने समाधान न झाल्याने अपीलकारांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले ज्याची दिनांक ३/१२/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती.सुनावणीला अपीलकार उपस्थित नव्हते.,जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिका-यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अपीलकार सुनावणीला उपस्थित नसल्यामुळे त्यांचे म्हणणे समजून घेता आले नाही. त्यांचा अपील अर्ज विचारात घेण्यात आला. उत्तरवादींचे म्हणणे व त्यांनी आयोगाला सादर केलेला खुलासा तसेच उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपीलकार हे सहाय्यक पोलीस निरीक्षक (निलंबित ) असून त्यांच्याविरूद्ध इंदापूर कोर्टात खाजगी केस दाखल झाली होती.या प्रकरणाच्या तपास अधिका-यांनी अर्जदाराविरूद्ध चार्जशीट दाखल करण्यासाठी मंजूरी मिळण्याबाबतचा प्रस्ताव, सदर प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाकडून परत

पाठवला त्या पत्राची प्रत, याबाबतचा पत्रव्यवहार,सदर प्रकरणाची सदयस्थिती अशा स्वरुपाची अपीलकाराने जनमाहिती अधिका-यांकडे माहिती मागितली होती. जनमाहिती अधिका-यांनी अधिनियमातील कलम ८ (ज) च्या तरतूदीच्या आधारे अर्जदाराला माहिती नाकारली. अपीलकाराने दाखल केलेल्या प्रथम अपिलावर प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले. प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशानुसार अधिनियमातील कलम ८(ड) नुसार अपीलकाराने मागितलेली माहिती देणे बंधनकारक नाही अशी त्यांची खात्री पटल्यामुळे तसेच माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत कारवाई संदर्भात सल्ला वा अभिप्राय स्वरूपाची माहिती देणे अभिप्रेत नाही या जनमाहिती अधिका-यांच्या मताशी सहमत असल्यामुळे प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी त्यांचे अपील फेटाळले.

अपीलकाराने दाखल केलेल्या व्दितीय अपीलानुसार वरील दोन्ही तरतूदी सदर प्रकरणात लागू होत नाहीत. तसेच मागितलेल्या माहितीच्या आधारेच ते त्यांच्यावर अन्याय झाला आहे हे उघड करू शकतात. त्यामुळे त्यांना माहिती द्यावी असे त्यांचे म्हणणे आहे.

वरील सर्व बाबींचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलकाराने विचारलेली माहिती ही अपीलकारावर करण्यात आलेल्या फौजदारी कार्यवाहीच्या अनुषंगाने असलेली माहिती आहे. तथापि अपीलकारावरील दोषारोप पत्राबाबत व तपासा संदर्भात संबंधित तपास अधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांच्यात झालेला पत्रव्यवहार, दोषारोपपत्र दाखल करण्याची मंजूरी घेणे, दोषारोपपत्र दाखल करण्यासाठी घ्यावयाची परवानगी या सर्व मुख्य कार्यवाही दरम्यानच्या प्रक्रिया आहेत. या बाबी उघड केल्याने एकूण कार्यवाहीवर परिणाम होण्याची वा अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे असे आयोगाचे मत आहे. दोषारोप पत्राची प्रत त्यांना मिळेलच. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**(सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक १५ /१२/२००८.**

**मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/३१०३/०२**

**श्री. मच्छिंद्र एन. कारळकर,** **------ अपीलकर्ता**
**हजारीबाई हाऊस, रुम नं.५,**
**इर्ला सोसायटी रोड,विलेपार्ले (प.), मुंबई-४०० ०५६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/साऊथ वॉर्ड,**
**एम.जी.रोड, कांदिवली (प.) मुंबई- ४०० ०६७.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इमारती व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/साऊथ वॉर्ड,**
**एम.जी.रोड, कांदिवली (प.) मुंबई- ४०० ०६७.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. मच्छिंद्र एन.कारळकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ४.१२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/साऊथ विभाग यांच्याकडे दि. १.९.२००७ रोजी अर्ज करुन, एस.व्ही.रोड, कांदिवली (प.), मुंबई, अभिलाषा अपार्टमेंट, रिलायन्स एनर्जीच्या समोरील डिलिकॅसी हॉटेल तसेच सीटी सर्व्हे क्र.७७८, ठाकूर कॉम्प्लेक्स, अनंत अपार्टमेंट येथील सुरुचि हॉटेल यांनी मोकळया जागेवर मोठी भिंत उभी करुन अनधिकृतपणे शेड बांधली आहे. याबाबत अनुषंगिक तीन मुद्दयांची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांच्याकडे दि. १.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१६.११.२००७ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदरहू दोन्ही हॉटेलच्या बांधकामाबाबतची सद्य:स्थिती लक्षात घेऊन सदरहू अनधिकृत बांधकामाबाबत पुढील आवश्यक ती कारवाई करावी असे दि.२०.११.२००७रोजी आदेश पारित केले. सदर आदेशाने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर

अपिलावर दि. १५.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/साऊथ विभाग यांच्याकडे दि. १.९.२००७ रोजी अर्ज करुन, एस.व्ही.रोड, कांदिवली (प.), मुंबई, अभिलाषा अपार्टमेंट, रिलायन्स एनर्जीच्या समोरील डिलिकॅसी हॉटेल तसेच सीटी सर्व्हे क्र.७७८, ठाकूर कॉम्प्लेक्स, अनंत अपार्टमेंट येथील सुरुचि हॉटेल यांनी मोकळया जागेवर मोठी भिंत उभी करुन अनधिकृतपणे शेड बांधली आहे. याबाबत अनुषंगिक तीन मुद्दयांची माहिती मागितली होती. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने जन माहिती अधिका-याकडे मागितलेल्या माहितीसंबंधी प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशानुसार अनधिकृत बांधकामाची तपासणी करुन १० दिवसाच्या आत अपिलकारास माहिती द्यावी. सबब सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( डॉ.सुरेश जोशी )**
**मुख्य राज्य माहिती आयुक्त**

**मुंबई,**
**दिनांक १५/१२/२००८.**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**रामाआ२००८/अपील क्रमांक २५९१/०२**

**श्री. कमलाकर रत्नाकर शेणॉय,**
**२/१३, आदिनाथ सीएवएस ,**
**सर एली कटुरी शाळेसमोर ,माझगांव, मुंबई- ४०० ०१०** ------- **अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त (प्रतिबंध),**
**गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग,**
**पोलीस आयुक्तांचे कार्यालय,मुंबई-०१**

**जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**(गुन्हे) पोलीस आयुक्तांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबईमुंबई- ०१** ------ **उत्तरवादी**

## -विवेचन-

श्री. कमलाकर रत्नाकर शेणॉय, मुंबई यांनी १५ लाख डॉलर्सच्या बनावट डिमांड ड्राफ्ट प्रकरणाच्या बाबतीत केलेल्या तक्रारीच्या संदर्भात असलेल्या कागदपत्रांची व संबंधित फाईल नोटींगची प्रत मिळण्यासाठी जन माहिती अधिका-यांकडे माहितीचा अर्ज केला होता. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अर्जदाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशानेही समाधान न झाल्याने अपिलकाराने आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलाची दिनांक १३.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर व उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर असे दिसून येते की, फाईलचे नोंटींग अधिनियमातील कलम-२ मध्ये दिलेल्या व्याख्येत बसत नसल्यामुळे जन माहिती अधिका-यांनी फाईल नोटींगची माहिती नाकारली. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी जन माहिती अधिका-यांच्या मताशी सहमती असल्याचे नमूद करुन आदेश पारित केले आहेत. जन माहिती अधिका-यांनी फाईल नोटींग व्यतिरिक्त इतर सर्व माहिती अपिलकाराला दिली आहे.

अधिनियमाच्या कलम २ (झ) प्रमाणे फाईलचा समावेश "अभिलेखा" मध्ये होतो व कलम २ (च) प्रमाणे " माहिती" याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेखाचा समावेश आहे. फाईलमध्ये नोटींग व केसपेपर्स असे दोन भाग असतात. त्यामुळे फाईल नोटींग हे अभिलेखाच्या संज्ञेत मोडते व त्यामुळे फाईल नोटींग ही माहिती आहे व ती मिळविण्याचा जनतेस अधिकार आहे.

फाईल नोटींग हा माहितीचाच भाग असल्यामुळे ती अपिलकाराला जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. ही बाब अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे.

सबब जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराला त्यांनी मागितलेल्या फाईलच्या नोटींगची प्रत १० दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी असे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक १८/१२/२००८.**

**मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/३१०६/०२**

**श्री. शेख शाकीर अब्दुल सत्तार, ------अपिलकार**
**तवकल वस्ताद मळा, आयुर्वेद कॉलेज मागे,**
**टिळक रोड, अहमदागर.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव (नवि-२४),**
**नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कक्ष अधिकारी (नवि-२४),**
**नगर विकास मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२. ------- उत्तरवादी**

## - <u>वि वे च ा</u> -

अपिलकार श्री. शेख शाकीर अब्दुल सत्तार, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.१२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (नवि-२४), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दि. १४.९.२००७ रोजी अर्ज करुन, अहमदनगर महानगरपालिका विकास निधीतून नगर शहरामध्ये वेगवेगळया प्रभागामध्ये हायमॅक्स दिवे बसविण्यात आलेले आहेत. सदर हायमॅक्स दिवे अहमदनागर मनपा विकास निधीतून खर्च करुन बसविलेले हायमॅक्स दिव्याच्या पोलवर नगरसेवक व पदाधिका-यांच्या नावाची जाहिरात करता येते का, इत्यादी अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागितलेली माहिती अहमदनगर महानगरपालिकेशी संबंधित असल्याने जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराचा अर्ज आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांच्याकडे पाठवून तसे अपिलकारास दि.०५.१०.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव यांच्याकडे दि.२३.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.५.११.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलाच्या अनुषंगाने माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, नवि-२४ यांनी अपिलकारास मागितलेली माहिती दि. १५.११.२००७ पर्यंत दयावी असे आदेश पारित केले. जन

माहिती अधिका-यांनी दि.२३.११.२००७ रोजी दिशाभूल करणारी अपूर्ण माहिती दिल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १५.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

अर्जदारास जी माहिती देण्यात आली आहे ती मुंबई प्रांतिक (महानगरपालिका) जाहिरात व फलक, नियंत्रण नियम, २००३ शी आुसरुन दिलेली दिसते. अहमदनगर पालिकेसंदर्भातील परिस्थिती त्यांना अहमदागर महाागरपालिकेकडून कळू शकेल. मात्र, अर्जदाराचा जो मूलभूत मुद्दा आहे तो की हा खर्च सरकारल निमशासकीय तिजोरीतून होत असतांना एखाद्या पदाधिका-याने त्या खर्चातून निर्माण होणा-या कामाचे श्रेय घ्यावे काय ? याबाबत नगर विकास विभाग यांचेकडे उत्तर दिसून येत नाही. याबाबत पदाधिका-यांचे म्हणणे विचारात घ्यावे लागेल. अर्जदारास हवे तर त्यांनी याबाबतीत मुख्यमंत्री पातळीवर या विषयाबाबत आपले मत पाठवून त्याचा विचार करण्याची विनंती करावी. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ.सुरेश जोशी )**
**मुख्य राज्य माहिती आयुक्त**

**मुंबई,**
**दिनांक १५/१२/२००८**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**रामाआ२००८/अपील क्रमांक ३४९४/०२**

**श्री. शिवप्रकाश रामनयन तिवारी,**
**१०२/१, ए,सिद्दीक महम्मद चाळ,**
**जुना प्रभादेवी रोड, मुंबई- २५ -------**
**अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त,**
**परिमंडळ-३, भायखळा,**
**मुंबई - २७**
**जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**मध्य नियंत्रण कक्ष,मध्य प्रादेशिक विभाग,बावला कंपाउंड,**
**डॉ.बी.ए.रोड, भायखळा (पूर्व)**
**मुंबई- २७ ------ उत्तरवादी**

**-विवेचन-**

श्री.शिवप्रकाश रामनयन तिवारी,मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम२००५ अंतर्गत आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपीलावर दिनांक १५/१२/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीला अपीलकार व उत्तरवादी उपस्थित होते.
दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर व उत्तरवादींनी सादर केलेले लेखी खुलासे व उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर खालील बाबी स्पष्ट झाल्या.

श्री. तिवारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत त्यांच्याविरूद्ध श्रीमती अमृता प्रदीप तेरवनकर यांनी दादर पोलीस स्टेशनमध्ये दाखल केलेल्या FIR च्या बाबतीत एकूण ९ बाबींची माहिती मागितली होती. जनमाहिती अधिका-यांनी अधिनियमाच्या कलम ८ (ज) अन्वये अर्जदाराला माहिती नाकारली. त्यामुळे अर्जदाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी अपीलकाराला माहिती अर्जाच्या अनुषंगाने चार दिवसाच्या आंत माहिती देण्याचे आदेश दिले.त्याप्रमाणे अपीलकाराला माहिती देण्यात आली.तथापि अपीलकाराचे यासंदर्भात समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपीलामध्ये व्दितीय अपील दाखल करण्यामागची पार्श्वभूमी, कारणे, मागणी विस्तृत स्वरूपात विशद केली आहे. अपीलकाराने अपील दाखल करण्यामागच्या पार्श्वभूमीमध्ये साधारणतः माहिती अर्ज सादर केल्यापासून माहिती प्राप्त

होण्यापर्यंच्या बाबी अनुक्रमे दिल्या आहेत.अपीलामागच्या कारणामध्ये व मुद्दयामध्ये प्रथम अपीलीय अधिका-यांकडून या प्रकरणी अवलंबिण्यात आलेली कार्यपद्धती, त्यांनी पारित केलेले आदेश , आदेशामध्ये केलेले काही बाबींवरील भाष्य याबाबत असमाधान दर्शवणा-या बाबी नमूद केल्या आहेत तसेच आयोगाला काही सूचना केल्या आहेत व सल्ला दिलेला आहे.तर अपीलाच्या अंतिम भागामध्ये विलंबाबद्दल संबंधितांना शास्ती लावणे, विषयाशी संबंधित माहितीच्या सर्व नस्त्या मागवून घेणे,तसेच आयोगाने या प्रकरणातील संबंधितांना कायदयाच्या अंमलबजावणीसाठी प्रशिक्षण दयावे अशा स्वरूपाच्या मागण्या केल्या आहेत.

आयोगाने या सर्व बाबींचे अवलोकन केले आहे. तथापि सर्वप्रथम अर्जदाराने विचारलेल्या माहितीबाबत व पुरवलेल्या माहितीवर आयोग लक्ष केंद्रीत करत आहे. उपलब्ध कागदपत्रावरून असे दिसून येते की, विचारलेली माहिती ही अपीलकाराविरूद्ध दादर पोलीस स्टेशनमध्ये दाखल झालेल्या FIR बाबतची आहे आणि सदर प्रकरणी दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल झालेले नसल्यामुळे सुरवातीला अपीलकाराला माहिती नाकारण्यात आली.त्यानंतर प्रथम अपीलीय प्राधिका-यांच्या आदेशानंतर ३ दिवसाच्या आंत दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल करण्यात आले व माहिती अर्जाप्रमाणे अपीलकाराला मुद्देनिहाय माहिती देण्यात आली. प्राप्त माहितीपैकी अंजनीकुमारचा सदर प्रकरणातील जबाबासंदर्भात अंजनीकुमार यांचा सदर गुन्हयात व अभिलेखावर जबाब नाही ही चुकीची माहिती देण्यात आली असे अपीलकाराचे म्हणणे आहे.तथापि उत्तरवादींच्या म्हणण्यानुसार सदर माहिती उपलब्ध अभिलेखावरुन दिली आहे.तथापि सदर प्रकरणात अंजनीकुमारचा जबाब नोंदला किंवा नाही याबाबत प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी सत्यता पडताळावी व वस्तुस्थिती अपीलकाराला कळवावी असे आदेश देण्यात येत आहेत.याखेरीज प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी सुनावणी घेण्यास जाणीवपूर्वक विलंब केला असे अपीलकाराचे म्हणणे आहे. तथापि उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता सुनावणीच्या तारखा कधी अपीलार्थी गैरहजर असल्यामुळे तर कधी प्रथम अपीलीय प्राधिकारी कायदा व सुव्यवस्थेच्या कामांत व्यस्त असल्यामुळे तसेच काही महत्वाच्या बैठकाला उपस्थित राहावे लागल्यामुळे पुढे ढकलण्यात आल्याचे दिसून येते.यांत जाणीवपूर्वक सुनावणीला उशीर केला असे आयोगाला वाटत नाही . तथापि यापुढे प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी विहीत मुदतीत सुनावणी घेण्याची दक्षता घ्यावी अशी ताकीद देण्यात येत आहे.तसेच आदेश पारित करताना माहिती उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने वस्तुनिष्ठ विधाने करण्यात

यावी अशी सूचना देण्यात येत आहे. अपीलकाराला माहिती मिळण्यापेक्षा पोलीसावर कारवाई व्हावी यात स्वारस्य आहे अशा स्वरूपाची विधाने करू नयेत.

माहितीचा अधिकार अधिनियम२००५ च्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी आयोग सतत प्रयत्नशील असून आवश्यक त्या उपाययोजना सतत करण्याकडे आयोगाचा कल आहे. त्यामुळे अपीलकाराने जनमाहिती अधिका-यांचे प्रशिक्षण, कार्यपद्धती अशा आयोगाला केलेल्या सूचनांच्या बाबतीत वेगळयाने भाष्य करण्याची आयोगाला आवश्यकता वाटत नाही.

प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशानुसार माहिती चार दिवसात म्हणजे २०/४/२००८आंत देणे आवश्यक होते असे जरी असले तरी मूळ माहिती अर्जात नमूद केल्यानुसार अपीलकाराने माहिती व्यक्तिशः घेउन जाणे अपेक्षित होते. शासकीय माहिती अधिका-यांकडे दिनांक १९/४/२००८ रोजी माहिती तयार होती हे त्यांच्या लेखी निवेदनावरून व माहिती पुरवावयाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या दिनांक १९/४/२००८ च्या पत्रावरून स्पष्ट होते. म्हणजे अपीलकाराने दिनांक १९/४/२००८ रोजी व्यक्तिशः माहिती घेण्यासाठी जनमाहिती अधिका-यांकडे विचारणा केली असती तर त्यांना त्या दिवशी माहिती प्राप्त होउ शकली असती. सबब माहिती देण्यात जनमाहिती अधिका-यांकडून जाणीवपूर्वक विलंब झाल्याचे दिसून येत नाही.

वरील सर्व विवेचनाच्या आधारे अपीलकाराला माहिती अर्जाप्रमाणे माहिती प्राप्त झ ाली आहे हे स्पष्ट होते. माहिती देण्यामध्ये जनमाहिती अधिका-यांकडून व प्रथम अपीलीय प्राधिका-यांकडून सुनावणी घेण्याकरिता जाणीवपूर्वक विलंब झाल्याचे दिसत नाही. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**निर्णय**

अपील निकाली काढण्यात येत आहे**.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती ायोग,**
**महाराष्ट्र राज्य**

**मुंबई**
**दिनांक १८/१२/२००८**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**रामाआ२००८/अपील क्रमांक २५५०/०२**

**श्री. कमलाकर रत्नाकर शेणॉय,**
**२/१३, आदिनाथ सीएवएस ,**
**सर एली कटुरी शाळेसमोर,**
**माझगांव, मुंबई- ४०० ०१०** ------- **अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त (प्रतिबंध),**
**गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग,**
**पोलीस आयुक्तांचे कार्यालय,मुंबई-०१**

**जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**(गुन्हे) पोलीस आयुक्तांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबईमुंबई- ०१** ------ **उत्तरवादी**

## -विवेचन-

श्री.कमलाकर रत्नाकर शेणॉय, मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत एम.इ.सी.आर क्रमांक २०/२००१ मधील फाइल नोटींगची प्रत मिळण्यासाठी जनमाहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता. जनमाहिती अधिका-यांनी सदर माहिती अधिनियमाच्या कलम ८ (१)(ज) अन्वये नाकारली. अर्जदाराने दाखल केलेल्या प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले. प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी आपल्या आदेशामध्ये अभिलेखाच्या प्रती काढून घेउ नयेत व इतर काही अशा अटीं/ शर्ती घालून अपीलकाराला अभिलेखाचे परिक्षण करण्याची परवानगी दयावी असे जनमाहिती अधिका-यांना आदेश दिले. त्याप्रमाणे अपिलकाराला जन माहिती अधिका-यांनी निरीक्षणाची परवानगी दिली. मात्र, अपिलकाराला आवश्यक असलेल्या फाईल नोटींगच्या प्रती वा कागदपत्राच्या प्रती घेऊ दिल्या नाहीत. त्यामुळे अपिलकाराने आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. त्याची सुनावणी दि.८.८.२००८ रोजी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीला अपिलकार व जन माहिती अधिकारी हजर होते.

अपिलकाराने आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपिलानुसार अपिलकाराला फाईलच्या नोटींगची प्रत मिळणे अधिनियमानुसार क्रमप्राप्त आहे.

दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर व उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची फाईलच्या /अभिलेखाच्या

परिक्षणाबाबत परवानगी आहे. तथापि, त्यातील कागदपत्रांच्या प्रती देता येत नाहीत असे त्यांचे मत असल्याचे दिसून येते.

अधिनियमामध्ये 'माहितीचा अधिकार' याचा अर्थ, कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळविता येण्याजोगी माहिती मिळण्याचा अधिकार असे आहे आणि त्यामध्ये,

(१) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे,

(२) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखाच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती देणे. याबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो.

ज्या अभिलेखांचे अपिलकाराला परिक्षण करण्याची परवानगी देण्यात येते, त्यामधील अपिलकाराला आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती द्यावयास पाहिजेत असे आयोगाचे मत आहे व ते अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे.

सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**अपिलकाराला त्यांनी मागितलेल्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिका-यांनी ७ दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्याव्यात.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक १८/१२/२००८.**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**रामाआ२००८/अपील क्रमांक ३५०१ /०२**

**श्री. अरविंद भास्कर मेस्त्री,**
**१५,९/९, लकडीवाला चाळ,भूखंड क्रमांक २७३/२७४,**
**जवाहर पथ,घाटकोपर(पूर्व),**
**मुंबई-४०० ०७७** **-------अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त,**
**परिमंडळ-६, चेंबूर, मुंबई- ४०० ०७१.**

**जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**पूर्व प्रादेशिक विभाग,नियंत्रण कक्ष,**
**चेंबूर ,मुंबई- ४०० ०७१ .** **------ उत्तरवादी**

## -विवेचन-

श्री.अरविंद भास्कर मेस्त्री, मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मा. महानगर दंडाधिकारी ,४९ वे न्यायालय, विक्रोळी,मुंबई यांच्यासमोर दाखल झालेल्या खाजगी फिर्याद क्रमांक १७ I&R /०७ बाबत एकूण चार मुद्दयांची माहिती मिळण्यासाठी जनमाहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता.जनमाहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने व प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी अपील फेटाळल्यामुळे अपीलकाराने आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले, ज्याची दिनांक १७/१२/२००८ रोजी सुनावणी आयोजित केली होती.सुनावणीला जनमाहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

उपस्थितांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर,अपीलकाराचा व्दितीय अपील अर्ज, उत्तरवादींनी सादर केलेले लेखी निवेदन व उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपीलकारांनी खाजगी फिर्याद क्र.१७ आय अँड आर/०७ बाबत काही मुद्दयांची माहिती मागितली होती.जनमाहिती अधिका-यांनी सदर माहिती अधिनियमाच्या कलम ८(१)(ज) नुसार नाकारली. प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी जनमाहिती अधिका-यांचे उत्तर योग्य आहे असे नमूद करून प्रथम अपील फेटाळले.मात्र आदेश पारित करण्यापूर्वी प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी सुनावणी घेतली नाही. ही अनुचित बाब आहे . सबब यापुढे प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी सुनावणी घेउनच आदेश पारित करण्याची दक्षता घ्यावी, अशी त्यांना ताकीद देण्यात येत आहे.अपीलकाराच्या व्दितीय अपीलाच्या अर्जाचे अवलोकन केले

असता, त्यांना माहिती नाकारण्याचे कारण मान्य नाही तसेच प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी सुनावणी घेता आदेश पारित केले याबाबत आक्षेप आहे, हे व्दितीय अपील दाखल करण्यामागचे मुख्य मुद्दे आहेत.सुनावणी घेण्याबाबत प्रथम अपीलीय प्राधिका-यांना समज देण्यात आलेली आहे.माहिती नाकारण्यामागच्या कारणाबाबत असे दिसून येते की,उत्तरवादींनी आयोगाला सादर केलेल्या लेखी खुलाशानुसार वर नमूद प्रकरणाचा तपास चालू आहे.तपास चालू असताना मध्येच त्याची माहिती उघड केल्याने चौकशीवर परिणाम होउ शकतो , असे आयोगाचही मत आहे.त्यामुळे जनमाहिती अधिका-यांनी व प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी माहिती नाकारण्यामागे दिलेल्या कारणाशी आयोग सहमत आहे. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**निर्णय**

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक १९/१२/२००८**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**रामाआ२००८/अपील क्रमांक ३५००  /०२**

**श्री. मोईद्दीन रमझान शेख,**
**एम.जी.५६, सुप्रिया हॉटेलजवळ,**
**वत्सला ताईनाईक नगर, बर्वे मार्ग,**
**चेंबूर, मुंबई-४०० ०७१** ------- **अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त,**
**परिमंडळ-६, चेंबूर, मुंबई- ४०० ०७१.**

**जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**पूर्व प्रादेशिक विभाग,नियंत्रण कक्ष,**
**चेंबूर, मुंबई- ४०० ०७१.** ------ **उत्तरवादी**

**-विवेचन-**

निर्णय

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त  दिनांक**

**१८/१२/२००८**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**रामाआ २००८/अपील क्र.३४३५/०२**

**श्री.राजेंद्र काळू नानकर,**
**एन-५३, ए.जे. १/२६/५, महात्मा फुले नगर,**
**पवननगर, सिडको, नवीन नाशिक - ८** **------- अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा**
**उपसचिव (कार्यासन ई- १),**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२**

**जनमाहिती अधिकारी तथा**
**कक्ष अधिकारी (कार्यासन ई-१),**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई -४०० ०३२** **------ उत्तरवादी**

## -विवेचन-

श्री.राजेंद्र काळू नानकर, नाशिक यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत तहसीलदार रमेश मिसाळ यांच्या बदलीच्या अनुषंगाने काही मुद्दयांची माहिती मिळण्यासाठी जनमाहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता. जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले.प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशानंतरही काही माहिती न मिळाल्याने तसेच अपूर्ण माहिती, विहीत मुदतीत माहितीचा अर्ज संबंधितांकडे हस्तांतरित न करणे या कारणास्तव अपीलकाराने आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे, ज्याची दिनांक४/१२/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीला अपीलकार व जनमाहिती अधिकारी उपस्थित होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर व अपीलकाराचे व्दितीय अपील व लेखी निवेदन , जनमाहिती अधिका-यांचा लेखी खुलासा आणि उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपीलकाराने माहितीच्या अर्जान्वये तहसिलदार श्री. रमेश मिसाळ यांच्या बदलीच्या अनुषंगाने एकूण ८ मुद्दयांवर माहिती मागितली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती

अधिकारी यांनी अर्जदाराला उत्तर पाठवले. विचारलेल्या माहितींच्या मुद्दयांपैकी एका मुद्दयाची माहिती जनमाहिती अधिका-यांच्या विभागातील दुस-या कार्यासनाकडे असल्यामुळे ती त्या कार्यासनाकडून घेण्याबाबत जनमाहिती अधिका-यांनी अर्जदाराला कळवले व त्यासाठी माहितीच्या अर्जाची प्रत त्या कार्यासनाकडे पाठवित असल्याचे कळविले. याशिवाय मुद्दा क्रमांक १ ची माहिती दिली मात्र संबंधित कागदपत्र कार्यासनात उपलब्ध नसल्यामुळे देता येत नाहीत, असे कळविले.मुद्दा क्रमांक ५,६ व ७ ची माहिती विभागीय आयुक्त स्तरावरील असल्यामुळे ती अर्जदाराला तेथून मिळू शकेल असे कळविण्यात आले.

अपीलकारांनी दाखल केलेल्या अपीलावर प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले. प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाचे अवलोकन केले असता, प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी सदर प्रकरणी सर्व बाबींचे तपशीलवार विवेचन केल्याचे दिसून येते. अपीलकाराने प्रथम अपीलात उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी मुद्देनिहाय मत नोंदवले आहे. मुद्दा क्रमांक १,५ व ६ बाबतची माहिती संबंधित प्राधिकरणाकडे पाठवून त्यांच्याकडून ती उपलब्ध करून घेण्याचे प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी जनमाहिती अधिका-यांना आदेश दिले आहेत.

अपिलकाराला मुद्दा क्रमांक १,५,६,७,८ ची माहिती अदयाप मिळालेली नाही. तसेच अर्जाचे हस्तांतरण विहीत वेळेत झालेले नाही हे अपीलकाराच्या व्दितीय अपीलाचे मुख्य मुद्दे आहेत. उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, प्रथम अपीलीय प्राधिका-यांच्या आदेशानंतर विभागीय आयुक्तांशी संबंधित असलेल्या माहितीसाठी (मुद्दा क्र.१, ५, ६, ७)अपीलकाराचा माहिती अर्ज जनमाहिती अधिका-यांनी विभागीय आयुक्त कार्यालयाला पाठवला आहे व संबंधित माहिती विभागीय आयुक्त कार्यालयाकडून उपलब्ध करून घ्यावी असे अपीलकाराला कळविले आहे. मुद्दा क्रमांक ८ बाबत संबंधित कार्यासन अधिकारी यांनी माहिती विभागीय आयुक्तांकडून मागविली आहे व प्राप्त झाल्यानंतर देण्यात येईल असे कळविले आहे. मात्र अदयाप सदर माहिती अपीलकाराला देण्यात आलेली नाही.

माहितीच्या अर्जाचे हस्तांतरण संबधितांकडे वेळेत झाले नाही यामागे कामाच्या व्यापामुळे सदर चूक झाली असल्याचे कारण जनमाहिती अधिका-यांनी दिले आहे. ज्याअर्थी एका मुद्दयाच्या (मुद्दा क्रमांक ८) माहितीसाठी जनमाहिती अधिका-यांनी माहिती अर्ज संबंधित कार्यासनाकडे पाठवला आहे त्याअर्थी विभागीय आयुक्तांकडे माहिती अर्जाची प्रत पाठवण्याचे अनावधानाने राहून गेले हे म्हणणे मान्य करण्यास पुरेसा वाव आहे असे आयोगाला वाटते.तथापि माहितीच्या अर्जावरील सर्व कार्यवाही कायदयाने विहीत

केलेल्या मुदतीतच पूर्ण होईल याची जनमाहिती अधिका-यांनी दक्षता घ्यावी अशी जनमाहिती अधिका-यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे. जी माहिती विभागीय आयुक्तस्तरावरील आहे ती माहिती त्या कार्यालयाकडून प्राप्त करून घ्यावी हे जनमाहिती अधिका-यांचे म्हणणे योग्य आहे.

सदर प्रकरणात विभागीय आयुक्त हे वेगळे प्राधिकरण असल्याने अपीलकाराने त्यांच्याशी संबंधित माहिती विभागीय आयुक्त कार्यालयाकडून उपलब्ध करून घ्यावी असे जन माहिती अधिका-यांनी कळविले आहे. ते योग्य आहे. मात्र मुद्दा क्रमांक ८ ची माहिती संबंधित जनमाहिती अधिका-यांनी प्राप्त करून घेउन अपीलकाराला पुरवण्याचे कळविलेले असल्यामुळे सदर माहिती त्यांनी हे आदेश प्राप्त झ ाल्यापासून १० दिवसाच्या आंत संबंधितांकडून प्राप्त करून घेऊन अपीलकाराला पुरवावी असे आदेश देण्यात येत आहेत.

जनमाहिती अधिका-यांनी अर्जाचे हस्तांतरण जाणीवपूर्वक विलंबाने केल्याचे दिसून येत नसल्यामुळे, तसेच उपलब्ध माहिती अपीलकाराला पुरवली असल्यामुळे व वरील विवेचन लक्षात घेउन मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## निर्णय

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक २२/१२/२००८.**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहित ीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**रामाआ २००८/अपील क्र.३४३६/०२**

**श्री. राजेंद्र काळू नानकर,**
**एन-५३, ए.जे. १/२६/५, महात्मा फुले नगर,**
**पवननगर, सिडको, नवीन नाशिक - ८** **------- अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा**
**उपसचिव (कार्यासन ई- १),**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२**

**जनमाहिती अधिकारी तथा**
**कक्ष अधिकारी (कार्यासन ई-१),**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई -४०० ०३२** **------उत्तरवादी**

## -विवेचन-

श्री. राजेंद्र काळू नानकर, नाशिक यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत श्रीमती प्रज्ञा बढे (मिसाळ ), मुद्रांक जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या बदलीसंदर्भात एकूण ५ मुद्दयांची माहिती मिळण्यासाठी जनमाहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता.जनमाहिती अधिका-यांनी उशिरा माहिती दिली, व त्याबाबत स्वयंस्पष्ट खुलासा दिला नाही , या कारणास्तव अपीलकारांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे, ज्याची दिनांक ४/१२/२००८ रोजी सुनावणी आयोजित केली होती. सुनावणीला अपीलकार व जनमाहिती अधिकारी उपस्थित होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर व जनमाहिती अधिका-यांचा लेखी खुलासा,अपीलकाराचे लेखी निवेदन व उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपीलकाराने त्यांच्या दिनांक १५/११/२००७ च्या माहिती अर्जान्वये माहिती मागितली होती. जनमाहिती अधिका-यांच्या म्हणण्यानुसार त्यांना अपीलकाराचा अर्ज दिनांक १९/११/२००८ रोजी प्राप्त झाला. जनमाहिती अधिका-यांनी त्यांच्या दिनांक १९/११/२००७ च्या पत्रान्वये अर्जाला आवश्यक ते शुल्क भरण्याविषयी अर्जदाराला कळविले.तथापि अपीलकाराच्या म्हणण्यानुसार हे पत्र त्यांना दिनांक १/१/२००८

रोजी मिळाले. हे पत्र त्यांना ३० दिवसाच्या आंत म्हणजे दिनांक १९/१२/२००७ रोजी मिळणे आवश्यक होते.मंत्रालयाच्या पोस्ट ऑफीसचा त्यावर दिनांक २७/१२/२००७ चा शिक्का आहे. म्हणजे जनमाहिती अधिका-यांकडून त्यांना पत्र पाठविण्यास ८ दिवस उशीर झाला आहे. त्यामुळे जन माहिती अधिका-यांना रू.२०००/- इतकी शास्ती लावण्यात यावी. जन माहिती अधिका-यांचे पत्र दि.१९.११.२००७ रोजीचे आहे. पण पत्र असणा-या लिफाफ्यावरचा शिक्का दि.२७.१२.२००७ चा आहे. इतका वेळ हे पत्र कुठे होते, एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी कां लागावा याची चौकशी उप / सह सचिव (आस्थापना), महसूल विभाग यांनी करुन दोषी व्यक्तीवर कारवाई करावी. जनमाहिती अधिका-यांकडून अपीलकाराने वर नमूद केल्याप्रमाणे माहिती कळविण्यास उशीर केला असे म्हणता येणार नाही. प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी सुनावणी घेतल्यानंतर जनमाहिती अधिका-यांनी अपीलकाराला माहिती उपलब्ध करून दिली आहे. अपीलकारांनी आयोगाकडे सादर केलेल्या लेखी निवेदनानुसार त्यांची दिलेल्या माहितीबाबत काही तक्रार असल्याचे दिसून येत नाही.

अपीलकाराला माहिती उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे व दोषीविरुध्द कारवाई करण्यास विभागास निर्देश दिले असल्याने मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**निर्णय**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक २२/१२/२००८.**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**रामाआ २००८/अपील क्र.३४३७/०२**

**श्री. राजेंद्र काळू नानकर,**
**एन-५३, ए.जे. १/२६/५, महात्मा फुले नगर,**
**पवननगर, सिडको, नवीन नाशिक - ८ -------अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा**
**उपसचिव (कार्यासन ई- १),**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२**

**जनमाहिती अधिकारी तथा**
**कक्ष अधिकारी (कार्यासन ई-१),**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ ------ उत्तरवादी**

## -विवेचन-

श्री. राजेंद्र काळू नानकर, नाशिक यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत श्रीमती प्रज्ञा बढे मिसाळ, मुद्रांक जिल्हाधिकारी यांचा शासकीय कार्यकाल,त्यांच्याविषयीच्या तक्रारी,बदल्या याबाबत माहिती मिळण्यासाठी जनमाहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता. माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.ज्याची दिनांक ४/१२/२००८ रोजी सुनावणी आयोजित केली होती.सुनावणीला अपीलकार व जनमाहिती अधिकारी उपस्थित होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर व जनमाहिती अधिका-यांचा लेखी खुलासा, अपीलकाराचे लेखी निवेदन व उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकाराने दि.२१.५.२००७ रोजी माहितीचा अर्ज केला. माहिती मिळालेली नसल्याने त्यांनी दि.७.१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी असे सांगितले की, सदर माहितीचा अर्ज जनमाहिती अधिका-यांकडे इतर कार्यासनाकडून हस्तांतरित होउन आला .सदर अर्जाच्या पुढे टिप्पणी जोडण्यात आली होती व या अर्जाची नोंद माहितीच्या अधिकाराच्या नोंदवहीत स्वतंत्रपणे करण्यात आली नव्हती. त्यामुळे सदर अर्ज माहितीच्या अधिकार

अधिनियमांतर्गत आहे हे जनमाहिती अधिका-यांच्या लक्षात आले नाही. त्यामुळे माहिती देण्याचे राहून गेले. जनमाहिती अधिका-यांच्या म्हणण्यानुसार जरी दिनांक २१/५/२००७ च्या अर्जातील माहिती देण्याचे राहून गेले असले तरी अर्जदारांनी वेळोवेळी यासंदर्भात केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने ती माहिती दिली गेली आहे. असे जरी असले तरी प्रत्येक माहिती अर्जाच्या अनुषंगाने स्वतंत्रपणे माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. प्रथम अपीलाच्या आदेशाचे अवलोकन केले असता जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २१/५/२००७ च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती तयार असल्याचे दिसून येते. जनमाहिती अधिका-यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या लेखी खुलाशानुसार अपीलकार एकाच व्यक्तिबद्दल तीच तीच माहिती वेगवेगळे माहिती अर्ज करून मागत आहेत.तसेच ते माहिती प्रश्नार्थक स्वरूपात मागतात जे अधिनियमांतर्गत अपेक्षित नाही . अपीलकारांनी आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपीलांच्या नस्त्याचे अवलोकन केले असता या बाबीला दुजोरा मिळतो.

वरील विवेचन लक्षात घेता, जनमाहिती अधिका-यांनी अपीलकाराला दिनांक २१/५/२००७ च्या अर्जाच्या अनुषंगाने स्वतंत्रपणे हे आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसांच्या आंत विनाशुल्क माहिती उपलब्ध करून दयावी व सदर बाबतचा अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा असे आदेश देण्यात येत आहेत.

जनमाहिती अधिका-यांनी अर्जदारांनी वेळोवेळी (दि.३.१०.२००६, २१.५.२००७, १०.८.२००७, ३१.१०.२००७, १६.११.२००७, १७.७.२००८ रोजी) केलेल्या या एकाच विषयावरील माहिती अर्जांचे अनुषंगाने उपलब्ध अभिलेखावरून माहिती देण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसून येत असल्यामुळे या प्रकरणी त्यांनी जाणीवपूर्वक माहिती देण्याचे टाळले आहे , असे आयोगाला वाटत नाही.सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## निर्णय

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक २२/१२/२००८.**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**रामाआ २००८/अपील क्र. ३४३८/०२**

**श्री. राजेंद्र काळू नानकर,**
**एन-५३, ए.जे. १/२६/५, महात्मा फुले नगर,**
**पवननगर, सिडको, नवीन नाशिक - ८** **-------अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा**
**उपसचिव (कार्यासन ई- ४),**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२**

**जनमाहिती अधिकारी तथा**
**अवर सचिव (कार्यासन ई-४),**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई -४०० ०३२** **------उत्तरवादी**

## -विवेचन-

श्री. राजेंद्र काळू नानकर, नाशिक यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत श्रीमती प्रज्ञा बढे मिसाळ, मुद्रांक जिल्हाधिकारी यांच्या विरूद्ध गंभीर तक्रारीबाबतचा मा. राज्यपाल यांना उद्‌देशून लिहलेल्या व मा.मुख्यमंत्री,मा. मंत्री (महसूल) व अन्य अधिका-यांना अग्रेषित केलेल्या अर्जावर चौकशी झाली असल्यास त्याबाबतची सविस्तर माहिती कार्यालयीन टिप्पणीसह मिळावी यासाठी माहितीचा अर्ज केला होता. सदर पत्र व माहितीचा अर्ज मा. राज्यपाल यांचे कार्यालयाने महसूल व वन विभाग,मंत्रालय यांच्याकडे पाठविला. महसूल व वन विभागाच्या जनमाहिती अधिकाऱ्यांनी सदर तक्रारीची प्रत नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्या कार्यालयात पाठविण्यात आल्याचे व त्यांच्याकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर कळविण्यात येईल असे अपीलकाराला कळवले.अहवालाची माहिती प्राप्त न झ ााल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले,त्यानुसार प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी सुनावणीला प्रस्तुत चौकशीचे प्रकरण हाताळणा-या संबंधित अधिकाऱ्यांनाही बोलावण्यात आले होते. तथापि प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या दिवसापर्यंत तक्रार अर्जाच्या अनुषंगाने चौकशी पूर्ण झाली नव्हती व अहवाल जनमाहिती अधिकाऱ्यांकडे प्राप्त झाला नव्हता. प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांनी सदर चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवाल व त्यावरील

शासनाचा निर्णय याबाबतची माहिती अपीलकाराला उपलब्ध करून देण्याच आदेश दिले आहेत.अपीलकाराने माहिती दिली नाही व अहवाल दिला नाही या कारणास्तव व्दितीय अपील दाखल केले आहे.

तथापि, प्राप्त तक्रार अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी संबंधितांकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर अपीलकाराला कळविण्यात येईल. असे कळविले आहे. म्हणजे माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी सदयस्थितीची माहिती दिली आहे. उपरोक्त संदर्भाधीन प्रकरणात चौकशी करून अहवाल सादर करणे ही जनमाहिती अधिकारी यांची जबाबदारी नसून माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध माहिती देणे ही जनमाहिती अधिका-यांची जबाबदारी आहे. सदर प्रकरणी जनमाहिती अधिका-यांकडून माहितीचा अधिकार अध्रिनयामांतर्गत अपेक्षित कार्यवाही पूर्ण झाली आहे.

वरील प्रकरणात प्रथम अपिलातील निर्णय पुढीलप्रमाणे आहे.

(१) अपिलार्थी श्री.राजेंद्र काळू नानकर यांचा दि.३१.१०.२००७ चा अपील अर्ज अंशतःमान्य करण्यात येतो.

(२) अपिलार्थी श्री.राजेंद्र काळू नानकर यांनी सुनावणीच्यावेळी सादर केलेले त्यांचे दि.७.१.२००८ चे निवेदन आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पाठविण्यांत यावे.

(३) श्रीमती प्रज्ञा बढे-मिसाळ यांचेविरुध्द गंभीर तक्रारीबाबत नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, नाशिक विभाग यांनी केलेल्या चौकशीचा अहवाल नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे दि.२७.१२.२००७ अन्वये सादर केलेला आहे. त्याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल अद्यापि शासनाकडे प्राप्त झ ालेला नाही. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावर श्ा्सन जो निर्णय घेईल त्याबाबत श्री.नानकर यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्यांत यावी.

(४) सदर आदेशाविरुध्द श्री.राजेंद्र काळू नानकर हे राज्य माहिती आयुक्त, मुंबई यांचेकडे. निर्णय मिळाल्याच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करु शकतात.

आयोगाकडील दि.४.१२.२००८ रोजीच्या सुनावणीच्या वेळी या प्रकरणातील नवीनतम स्थिती जी माहिती प्राधिका-यांनी प्रस्तुत केली ती पुढीलप्रमाणे :-

या प्रकरणी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांचे कार्यालयाकडे चौकशी केली असता श्रीमती बडे-मिसाळ यांनी कार्यालयीन कामात केलेल्या दिरंगाईबाबत त्यांना सक्त ताकीद देऊन त्यांच्या अहवालात नोंद करण्याबाबत त्या कार्यालयाच्या क्र.का-९/आस्था-२/तक्रार/प्र.क्र.१३२/०६-३९७, दि.७.२.२००८ अन्वये विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांचेकडे कार्यवाहीसाठी विनंती करण्यात आल्याचे नमूद केले. याबाबतचा केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विभागीय आयुक्त, नाशिक यांचेक कार्यालयाकडून उपलब्ध झालेला नाही. सदर अहवाल विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांचेकडून उपलब्ध करुन घेण्याबाबत श्री. नानकर यांना कळविण्यात येईल.

तसेच महसूल विभागो विभागीय आयुक्त यांना असेही निर्देश दिले की, श्रीमती प्रज्ञा बढे (मिसाळ) मुद्रांक जिल्हाधिकारी यांचे प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलार्थी श्री. राजेंद्र काळू नानकर यांना कळविण्यात यावा.

वरील सर्व विवेचनावरुन स्पष्ट होते की, महसूल विभागाकडील माहिती देण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे.

**निर्णय**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई,**
**दिनांक २२/१२/२००८.**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**रामाआ २००८/अपील क्र.३४७१/०२**

**श्रीमती चित्रा अनंत साळुंखे,**
**१ बी/१, गुडअर्थ सोसायटी,**
**रोड नं. २, सिंधी सोसायटी,**
**चेंबूर, मुंबई - ७१** ------- **अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त,**
**परिमंडळ - २, मुंबई**

**जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**दक्षिण प्रादेशिक विभाग, सर जे.जे. रोड,**
**नागपाडा, मुंबई - ८** ------ **उत्तरवादी**

## -विवेचन-

श्रीमती चित्रा अनंत साळुंखे, मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत समाजसेवा शाखेने श्री.व्ही.बी.तिवारी यांच्या विरूद्ध दाखल केलेल्या एफ आय आरची प्रत व सदर प्रकरणातील कारवाई याबाबतची माहिती मिळण्यासाठी जनमाहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता. माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपीलकाराला देय असलेली माहिती अर्जदाराला देण्यात आली व ती त्यांनी २/१२/२००६ रोजी स्वीकारली. त्यानंतर एका वर्षापेक्षाही जास्त कालावधीनंतर अर्जदाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी त्यावरही आदेश पारित केले आहेत. प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी अपील निकाली काढले. अपीलकाराने आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपीलावर दिनांक ८/१२/२००८ रोजी सुनावणी आयोजित केली होती. सुनावणीला जनमाहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

अपीलकाराने व्दितीय अपीलामध्ये ककाटिया विदयापीठाने पोलीस कार्यालयाला पाठविलेल्या पत्रात उल्लेख केलेल्या प्रोव्हिजनल सर्टिफिकेटच्या प्रतीची मागणी

केली आहे ज्याचा मूळ माहिती अर्जात उल्लेख नाही. सबब त्यावर या सुनावणीदरम्यान विचार करण्यात आला नाही. त्यांनी हवे तर यासाठी वेगळा अर्ज करावा.

अपीलकाराला माहिती अर्जाच्या अनुषंगाने देय असलेली माहिती यापूर्वीच पुरवण्यात आली असल्यामुळे सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**निर्णय**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक २२/१२/२००८.**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**रामाआ २००८/अपील क्र. ३५०२/०२**

**श्री.सुनिल रामगोपाल अग्रवाल,**
**सी-८०२, इंद्रलोक, स्वामी समर्थ नगर,**
**अंधेरी (प), मुंबई- ४०० ०५३** **-------अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त,**
**परिमंडळ ३ बावला कंपाउंड,**
**भायखळा, मुंबई -४०० ०२७**

**जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**मध्य नियंत्रण कक्ष,बावला कंपाउंड,**
**भायखळा,मुंबई- ४०० ०२७** **------उत्तरवादी**

## -विवेचन-

श्री. सुनिल रामगोपाळ_अग्रवाल, मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत त्यांनी दिनांक ९/६/२००७ व २६/४/२००८ रोजी माहिम पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीवर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती मिळण्यासाठी जनमाहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता. जनमाहिती अधिका-यांनी अपीलकाराला माहिती दिली.सदर प्रकरणी कारवाई झाली नसल्यामुळे व जनमाहिती अधिका-यांकडून विलंबाने माहिती प्राप्त झाली या कारणास्तव अर्जदाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी प्रथम अपीलावर सुनावणी घेउन आदेश पारित केले. सुनावणीच्या वेळी जनमाहिती अधिका-यांनी अपीलकाराला त्यांच्या दिनांक २६/४/२००८ च्या तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कारवाईची वरिष्ठ पोलीस निरीक्षक माहिम पोलीस ठाणे यांच्याकडून प्राप्त माहिती दिली. प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी प्रथम अपील निकाली काढले.

जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी विहीत वेळेत कार्यवाही केली नाही, तक्रार अदखलपात्र स्वरूपाची होती असे उडवाउडवीचे उत्तर देण्यात आले,९ जून २००७ च्या तक्रारीवरील कार्यवाहीचे अभिलेख नाहीत असे उत्तर दिले,तक्रारीच्या गांभीर्यानुसार कार्यवाही करण्यात आली नाही, माहीम पोलीस स्टेशनचे अधिकारी कार्यवाही करण्यास तयार नाहीत अशा स्वरूपाच्या कारणास्तव अपीलकाराने आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.सदर अपीलावर दिनांक १७/१२/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीला अपीलकार व जनमाहिती अधिकारी उपस्थित होते.

उपलब्ध कागदपत्रांवरून असे दिसून येते की , अपीलकाराने विचारलेली माहिती ही जन माहिती अधिका-यांनी माहिम पोलीस स्टेशनकडून प्राप्त करून घेउन अपीलकाराला दिली. यामध्ये दिनांक २६/४/२००८ रोजीच्या तक्रारीबाबत अदखलपात्र गुन्हयाची नोंद झाली आहे व दिनांक ९/६/२००७ च्या तक्रारीबाबत कार्यवाहीचे अभिलेख आढळून येत नाहीत. अशा स्वरूपाची माहिती देण्यात आली होती. मात्र प्रथम अपीलाच्या वेळी अपीलकारांनी दिनांक ९/६/२००७ च्या अर्जामध्ये त्यांच्या पत्नीबरोबर घटस्फोटाच्या बाबतीत मा. बांद्रा कौटुंबिक न्यायालयात रिट पिटीशन दाखल असून अर्जदाराची पत्नी व तिच्या नातेवाईकाकडून पैशाची मागणी करून अपीलकाराला त्रास दिला जात आहे अशा स्वरूपाची तक्रार होती.अर्जदार हे अंधेरी येथे राहत असल्याने व याबाबत अर्जदाराविरूद्ध वर्सोवा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद असल्याने तसेच मा. कौटुंबिक न्यायालयात रिट पिटीशन प्रलंबित असल्याने माहीम पोलीस स्टेशनने त्यांचा ९/६/२००७ चा अर्ज दफतर दाखल केला. दिनांक २६/४/२००८ च्या तक्रारीवर कोणतीही कारवाई झाले नसल्याचे अपीलकाराला कळविण्यात आले. थोडक्यात अपीलकाराच्या दोन्ही तक्रारीच्या अनुषंगाने कारवाईची असलेली वस्तुस्थिती कळविण्यात आलेली आहे. विचारलेली माहिती माहिम पोलीस स्टेशनकडून प्राप्त करून घेउन दिल्यामुळे उशीर झाल्याचे दिसून येते.तसेच प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी त्यांच्या आदेशामध्ये सुनावणीला झालेल्या विलंबाची कारणे नमूद केली आहेत.त्यावरून जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी यांच्याकडून जाणीवपूर्वक विलंब झाल्याचे दिसून येत नाही. अपीलकाराच्या व्दितीय अपीलाच्या कारणांचे अवलोकन केले असता,संबंधित अधिका-यांकडून कार्यवाही केली जात नाही अशी तक्रार असल्याचे दिसून येते. तथापि गुन्हा अदखलपात्र किंवा दखलपात्र आहे हे ठरविणे याबाबत सूचना देणे आयोगाच्या कक्षेतील बाब नाही.

जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध माहिती दिली असल्यामुळे व वरील विवेचन लक्षात घेउन मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## <u>निर्णय</u>

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई /दिनांक २३/१२/२००८**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**रामाआ २००८/अपील क्र.३४२९/०२**

**श्री. आनंद ह. सामंत,**
**१/ ब, मंदार, पांडुरंगवाडी,मार्ग क्रमांक ५,**
**गोरेगांव(पूर्व)मुंबई - ६३** **------- अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा**
**सहाय्यक आयुक्त पी /दक्षिण विभाग, मिठानगर,**
**मनपा शाळेची इमारत,गोरेगांव (प),मुंबई -६२**

**जनमाहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक कर निर्धारक व संकलक,**
**पी/ दक्षिण विभाग, समाजमंदिर हॉल, एम.जी. रोड,**
**उन्नतनगर, विभाग- १, गोरेगांव (प),मुंबई-** **------ उत्तरवादी**

**-विवेचन-**

श्री. आनंद ह. सामंत, मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम १९(३) अन्वये आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे. ज्याची दिनांक २/१२/२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली . सुनावणीला जनमाहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

अपीलकाराने प्रथम अपीलाच्या वेळी उपस्थित केलेल्या मुद्दयांकडे दुर्लक्ष करून प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याने अपीकाराचे आर्थिक नुकसान झाले आहे व त्यामुळे प्रथम अपीलीय प्राधिका-याच्या निर्णयाचे पुनर्विलोकन करून अपीलकाराने माहितीपोटी भरलेल्या फीचा परतावा त्यांना मिळावा, हे अपीलकाराचे व्दितीय अपील दाखल करण्यामागचे मुख्य कारण आहे.

या कारणाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, माहिती देण्यास उशीर झाल्यामुळे अपिलकाराला अधिनियमातील तरतूदीनुसार मोफत माहिती मिळावी असे त्यांचे म्हणणे आहे.त्याअनुषंगाने आयोगाने अपीलकाराने व्दितीय अपीलासोबत दाखल केलेल्या तारखांची व जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या लेखी खुलाशात सादर केलेल्या तारखांचे सूक्ष्म अवलोकन केले आहे.जनमाहिती अधिका-यांकडे दि.११/१२/२००७रोजी माहितीचा अर्ज प्राप्त झाला.अपीलकाराने पालिकेच्या पी /दक्षिण विभागाच्या हद्दीतील केआर डी एन इंडस्ट्रीयल इस्टेट नावाने परिचित मालमत्तेच्या हद्दीतील सन २००१ ते २००३ या कालावधीत अस्तित्वात असणा-या शेडबाबतच्या माहितीशी संबंधित अभिलेखांची पहाणी

करण्यास मिळण्यासाठी व त्यानंतर आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती मिळण्यासाठी जनमाहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता.

जनमाहिती अधिका-यांनी ९/१/२००८ रोजी अपीलकाराला अभिलेख पहाणीसाठीचे पत्र दिले व अपीलकाराने त्यादिवशी कागदपत्र पहाणी केली व आवश्यक छायांकित प्रतीची मागणी केली. जनमाहिती अधिका-यांनी शुल्क भरण्याविषयीचे पत्र दिनांक १६/१/२००८ रोजी पोस्टाने पाठविले.अपीलकाराने दिनांक १४/२/२००८ रोजी शुल्क भरल्यानंतर त्यांना कागदपत्रांच्या छायांकित प्रती देण्यात आल्या आहेत.अपीलकारांच्या मते त्यांना शुल्क भरण्याविषयीचे पत्र उशिरा मिळाले आहे. तथापि जनमाहिती अधिका-यांनी त्यांना दूरध्वनीवरून पत्र घेउन जाण्याविषयी कळविले होते. मात्र अपीलकारांनी सदर पत्र त्यांना पोस्टाने पाठविण्याविषयी कळविले होते.

जनमाहिती अधिका-यांची दूरध्वनीवरून पत्राविषयी माहिती देण्याची कृती ही त्यांची सत्वर माहिती देण्यामागचे प्रामाणिक प्रयत्न दर्शवते. टपालाच्या विलंबाची जनमाहिती अधिका-यांवर जबाबदारी टाकता येत नाही. तसेच त्यामुळे अपीलकाराने कालमर्यादेच्या पालनात कसूर केली असे म्हणता येणार नाही.

सबब सदर प्रकरणी प्रथम अपीलीय प्राधिका-यांच्या निर्णयाचे पुनर्विलोकन करण्याची वा त्यामध्ये बदल करण्याची आयोगाला आवश्यकता भासत नाही.

## निर्णय

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक २२/१२/२००८.**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**रामाआ २००८/अपील क्र.३४१७/०२**

**श्री. निळकंठ विनायक जोशी,**
**द्वारा- श्री. धनेश्वर व्ही. जैन,**
**ब्लॉक नं,४२६/४२७, ४ था मजला,**
**सिध्देश्वर को.ऑप.हौ.सोसायटी,**
**सिध्दार्थनगर, अलियावर जंग मार्ग,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई ३ ४०० ०५१.** **------- अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**नाजकधा-२, नगरविकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.**

**जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**नाजकधा-२, नगरविकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.** **------ उत्तरवादी**

## -विवेचन-

श्री. निळकंट विनायक जोशी, मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपिलावर दि. ३.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपिलकाराने नागरी जमीन कमाल धारणा कायद्यांतर्गत दुर्बल घटक घरबांधणी योजनेत भाईंदर व मीरा रोड येथील विकासकाने केलेला गैरव्यवहार याबाबत विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक ७५७९७ ला दिलेल्या उत्तरा संदर्भात एकूण ५ मुद्दयांबाबत माहिती मिळण्यासाठी जनमाहिती अधिका-याकडे अर्ज केला होता. जन माहिती अधिका-यांली विचारलेली बाब ही अधिनियमाच्या " माहिती " या संज्ञेनुरुन नसल्याचे नमूद करुन माहिती नाकरली. त्यामुळे अर्जदाराने प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी दरम्यान आवश्यक ती माहिती देण्याचे जन माहिती अधिका-यांना निर्देश दिले. त्यास अनुसरुन जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराला माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी मुद्दा क्र.१ च्या अनुषंगाने संबंधित शासन निर्णयाची प्रत दिली. मुद्दा क्र. २, ३ व ५ ची माहिती प्रश्नार्थक स्वरुपात असल्यामुळे व ती " माहिती " या संज्ञेत बसत नसल्यामुळे नाकारली. मुद्दा क्र.४ ची माहिती सक्षम प्राधिकारी, ठाणे नागरी समूह, ठाणे यांच्याकडून घ्यावी असे कळविले.

अपिलकाराने पुरविलेली माहिती त्रुटीयुक्त व अपुरी आहे. या कारणास्तव द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलामध्ये त्यांनी मुद्देनिहाय कारणे नमूद केली आहेत.

अपिलकाराच्या म्हणण्यानुसार मुद्दा क्र.१ च्या अनुषंगाने त्यांना प्राप्त झालेल्या शासन निर्णयामध्ये नमूद दोन परिपत्रकाच्या प्रती त्यांना मिळाल्या नाहीत. तथापि, जन माहिती अधिका-यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनानुसार ही परिपत्रके देण्याची तयारी दर्शविली आहे. मुद्दा क्र.२ ची माहिती जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराला दिलेली नाही. मात्र, आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये त्यांनी ही माहिती नमूद केली आहे. त्यावरुन मुद्दा क्र.२ ची माहिती देण्यास जन माहिती अधिका-यांना काही अडचण नाही असे दिसून येते. मुद्दा क्र.३ ची माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असली तरी प्रश्नात/ मुद्दया मध्ये विचारलेली बाब विचाराधीन वा सदर बाबीच्या अनुषंगाने कार्यवाही चालू असल्यास त्याबाबतची माहिती देण्यास जन माहिती अधिका-यांना अडचण नसावी. अशी माहिती वा संबंधित कागदपत्रांच्या प्रती देणे शक्य नसल्यास तसे सकारण अपिलकाराला कळवावे. प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली म्हणून माहिती नाकारणे या प्रकरणात योग्य होणार नाही. मुद्दा क्र.५ बाबतची ही बाब लागू होते. माहिती विशिष्ट विकासकासंदर्भात विचारलेली आहे. त्यामुळे त्याबाबत कार्यवाही चालू असल्यास त्याबाबतची माहिती अपिलकाराला उपलब्ध करुन देणे योग्यच आहे.

सबब, वरील विवेचन लक्षात घेता,

(१) मुद्दा क्र. १ संदर्भात जन माहिती अधिका-यांनी संबंधित परिपत्रकांची प्रत अपिलकाराला उपलब्ध करुन द्यावी.

(२) वर नमूद केल्याप्रमाणे मुद्दा क्र.२, ३ व ५ च्या अनुषंगाने जी सद्यःस्थिती असेल त्याची माहिती अपिलकाराला उपलब्ध करुन द्यावी.

ही सर्व कार्यवाही जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसाच्या आंत पूर्ण करावयाची आहे.

## निर्णय

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक २३/१२/२००८.**

F:\December-2008-(1).doc

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**रामाआ २००८/अपील क्र.३०९७/०२**

**श्री. एल. बी. शेख,**
**करेरा मेन्शन, अे ब्लॉक, तिसरा मजला,**
**फ्लॅट नं.८, सितलादेवी टेम्पल रोड,**
**माहीम, मुंबई ः ४०० ०१६.** **------- अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा**
**लाचलुचपत प्रतिबंध विभाग,**
**मधु इंडस्ट्रीयल इस्टेट, १ ला माळा,**
**पांडुरंग बुधकर मार्ग,**
**वरळी, मुंबई -४०० ०१३.**

**जनमाहिती अधिकारी तथा**
**लाचलुचपत प्रतिबंध विभाग,**
**मधु इंडस्ट्रीयल इस्टेट, १ ला माळा,**
**पांडुरंग बुधकर मार्ग,**
**वरळी, मुंबई -४०० ०१३** **------ उत्तरवादी**

## -विवेचन-

अपिलकार श्री. एल.बी.शेख, यांनी मागणी केलेली माहिती दिली नाही म्हणून व्यथित होऊन दि.११.३.२००८ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपिलाची सुनावणी आयोगाच्या कार्यालयात दि. १३.१०.२००८ रोजी आयोजित करण्यांत आली होती. सुनावणीकरिता अपिलकार, प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपिलकाराने अे.सी.बी. मुंबई विभाग, गु.र.क्र.७४/२००७ च्या तपासा दरम्यान साक्षीदार श्री.सुधीर विष्णू कांबळे यांच्या नोंदविलेल्या जबाबाच्या प्रतीची मागणी केली होती. तथापि, सदर गुन्हा तपासाधिन असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८ (१) (एच) अन्वये माहिती देता येत नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी दि. २८.१.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले होते.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे नाकारल्याने व्यथित होऊन अपिलकाराने दि.१६.२.२००८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२२.२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. त्यावेंळी अपिलार्थी यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी श्री. कमलेश हडकर उपस्थित होते. तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थीच्या प्रतिनिधींनी प्रथम खबरी अहवालाची प्रत मा.न्यायालयाकडेन प्राप्त झाल्याचे नमूद करुन माहितीची मागणी केली आहे. तर जन माहिती अधिकारी यांनी तपासी अधिकारी यांच्याकडे चर्चा केल्यानुसार श्री.सुधीर कांबळे यांच्या जबाबाची प्रत अपिलार्थींना दिल्यास तपासात अडथळा येण्याची शक्यता वर्तविल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम ८(१) (एच) अन्वये योग्यरित्या नाकारली असल्याचे नमूद करुन त्यांच्या मताशी प्रथम अपिलीय अधिकारी सहकत होऊन दि. १.३.२००८ रोजी प्रथम अपील फेटाळले आहे.

अपिलार्थींचे प्रथम अपील फेटाळल्याने अपिलार्थीने दि.११.३.२००८ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर प्रकरणातील दोनही पक्षकारांची बाजू ऐकून घेण्यात आली. तसेच उपलब्ध कागदपत्रे व सुनावणच्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केलेल्या दि.१३.१०.२००८ च्या अहवालाची सखोल तपासणी करण्यात आली असता सदर गुन्हयाच्या अनुषंगाने तपास चालू असल्याने व श्री. सुधीर कांबळे यांनी जबाबात सांगितलेली माहिती हा तपासाचा भाग असल्याने अपिलार्थीने मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ (१) (एच) नुसार अपिलार्थीना नाकारण्याच्या प्रथम अपिलीय अधिका-यांच्या निर्णयाशी आयोग सहमत आहे. तथापि, गुन्हयाच्या तपासाअंती न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केल्यानंतर मागितलेली माहिती अपिलार्थींना देण्याची जन माहिती अधिकारी यांनी दक्षता घ्यावी. तेव्हा खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक २३/१२/२००८.**

**मा. मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र. १५७/०८/०१**

**श्री. एम.डी. सुगांवकर,** **------ तक्रारदार**
**१/श्री साईनिकेतन सहकारी गृहनिर्माण संस्था म.**
**मॅडोना कॉलनी. एस.व्ही.पी.रोड,**
**बोरीवली (प.), मुंबई- ४०० १०३.**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सिडनॅहम कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड इकॉनॉमिक्स,**
**चर्चगेट, मुंबई- ४०० २०.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

तक्रारदार श्री. एम.डी.सुगावंकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.१०.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर मा.मुख्य माहिती आयुक्तांसमोर दि. १.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी माहिती विहित कालावधीत दिली नसल्याने तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे यापूर्वी दि.२१.३.२००७ रोजी उक्त अधिनियमातील कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली होती. तक्रारदाराने जन माहिती अधिका-यांकडे खाली नमूद केलेली माहिती मागितली होती.

(१) महाराष्ट्र राज्यातील शासकीय, खाजगी, अनुदानित महाविद्यालयात अर्धवेळ तत्वावर नेमणूक केलेल्या प्राध्यापकांसबंधीची तसेच महाविद्यालयाची संपूर्ण माहिती. त्यामध्ये कॉलेजचे नांव, प्राध्यपकांचे नांव, पत्ता, प्राध्यापक शिकवित असलेला विषय, प्राध्यापकांचे महिन्याचे वेतन, प्राध्यापक किती महिने/ वर्षापासन असे वेतन घेत आहेत, प्राध्यापकाच्या नेमणुकीचा दिनांक, शर्ती व अटी, शैक्षणिक पात्रता.

(२) सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालयात नेमणूक केलेल्या पूर्णवेळ, अर्धवेळ प्राध्यापकांची संपूर्ण कागदपत्र.

(३) सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महावद्यालयातील कामाचा भार, विभागात वेळोवेळी अर्धवेळ तत्वावर नेमणूक केलेल्या प्राध्यापकांची संख्या व कागदपत्र इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

तक्रारदाराने मागितलेली माहिती संचालक, उच्च व तंत्रशिक्षण, आणि सहसंचालक, उच्च व तंत्र शिक्षण यांचेशी संबंधित असल्याने तक्रारदाराचा अर्ज संबंधितांकडे हस्तांतरित करुन तसे गैरतक्रारदाराने तक्रारदारास कळविले. यामुळे व्यथित होऊन तक्रादराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.१० व ६७ तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीवर राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांनी सुनावणी आयोजित करुन तक्रारदाराने मागितलेली माहिती सहा आठवडयाच्या आत देण्याबाबत संचालक, उच्च व तंत्रशिक्षण यांना आदेश दिले होते. तसेच विहित कालावधीत माहिती न दिल्यास उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये कारवाई सुरु करण्यात येईल असे नमू करुन दि.५.९.२००८ व दि.३.१०.२००८ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशाविरुध्द तक्रारदाराने राज्य माहिती आयोगकाडे दि.२०.१०.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर मुख्य माहिती आयुक्तांनी सुनावणी घेऊन नये. त्यांची तक्रार सुनावणीकरिता अन्य राज्य माहिती आयुक्तांकडे हस्तांतरित करावी अशी मागणी केली. ठोस कारणाशिवाय तक्रारीवरील सुनावणी इतर राज्य माहिती आयुक्तांकडे हस्तांतरित करण्याची तक्रारदाराची मागणी मान्य करण्यात आली नाही. गैरतक्रारदाराने सुनावणीचेवेळी केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यात आले.

सिडनहॅम महाविद्यालयात तक्रारदार श्री.सुगावकर सन २००१ पासून तासिका तत्वावर वर्ग घेत होते. त्यांची नेमणूक प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली विभागप्रमुखांच्या समितीने केली होती. तासिका तत्वावर वर्ग घेणा-या शिक्षकास मानधन दिले जाते. ते नियमित शिक्षक नसल्यामुळे वेतन देय ठरत नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सुचनांनुसार व सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार अधिव्याख्याता पदावर नियुक्तीसाठी संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी ५५ टक्के गुणांनी उत्तीर्ण व नेट/सेट अर्हता प्राप्त असणे आवश्यक आहे. तक्रारदार हे सी.ए. असून पदव्युत्तर पदवी (एम.कॉम.) प्रथम श्रेणीत उत्तीर्ण आहेत. मात्र ते नेट/सेट अर्हता धारण करीत नाहीत. तक्रारदार यांनी तासिका तत्वावर शिकविण्याच्या केलेल्या कामाबाबत त्यांना देय असलेलेले २००४-०५ या वर्षाची रक्कम रु.२३,९८७/- त्यांना मंजूर केली होती. तथापि, ती स्विकारण्यास त्यांनी नकार दिला. त्यांनी अर्धवेळ अधिव्याख्यात्याचे वेतन द्यावे अशी मागणी केली आहे. परंतु सेवाप्रवेश नियमानुसार त्यांची अर्धवेळ अधिव्याख्याता म्हणून नियुक्ती करणे शक्य नाही. त्यांच्या मागणीनुसार त्यांना वेतन अदा करता येत नाही.

सिडनहॅम महाविद्यालयातील अर्धवेळ प्राध्यापकाबाबत तक्रारदाराने मागणी केलेली माहिती दि.९.५.२००८ च्या पत्रासोबत गैरतक्रारदाराने उपलब्ध करुन देवून पोच घेतली असल्याचा लेखी अहवाल सादर

करुन सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. महाराष्ट्रातील शासकीय, खाजगी, अनुदानित महाविद्यालयातील अर्धवेळ प्राध्यापकांबाबत तक्रारदाराने मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता तक्रारदाराने सर्व संबंधित महाविद्यालयातील जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांकडे विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन माहिती प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. तक्रारदार यांनी सिडनहॅम महाविद्यालयासंबंधी मागणी केलेली माहिती सिडनहॅम महाविद्यालयाच्या जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली आहे. या परिस्थितीत असे दिसून येते की, तक्रारदाराच्या माहितीच्या अधिकारातील अर्जावर गैरतक्रारदारांनी समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

.

**<u>आदेश</u>**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई,**
**दिनांक :-२९/१२/२००८**

**मा. मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**रामाआ-२००८/तक्रार ५ ते ९/०२**

**श्री. एम.डी. सुगांवकर,** **------ अपीलकर्ता**
**१/श्री साईनिकेतन सहकारी गृहनिर्माण संस्था म.**
**मॅडोना कॉलनी. एस.व्ही.पी.रोड,**
**बोरीवली (प.), मुंबई- ४०० १०३.**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सिडनॅहम कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड इकॉनॉमिक्स,**
**चर्चगेट, मुंबई- ४०० २०.** **------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. एम.डी.सुगावंकर**,** यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. रोजी तक्रार दाखल केली. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, सिडको, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, यांच्याकडे दि. २००८ रोजी अर्ज करुन, अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.४.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथ्व्यवस्थापक, सिडको, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित

केले नाहीत. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेशं देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत अपिलकारास माहिती दिली नाही. याबाबत त्यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई का करण्यात येऊ नये. प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले नाहीत. याबाबत त्यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी का प्रस्तावित करण्यात येऊ नये, यासंबंधी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२४/१२/२००८.**

**मा.मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**रामाआ २००८/अपील क्र.१३०२/०२**

**श्री. मकरंद दत्तात्रय सुगांवकर,**
**१/श्री साईनिकेतन सहकारी गृहनिर्माण संस्था म.**
**मॅडोना कॉलनी. एस.व्ही.पी.रोड,**
**बोरीवली (प.), मुंबई- ४०० १०३.** **------- अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सह सचिव,**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.**

**जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.** **-------- उत्तरवादी**

**-विवेचन-**

अपिलकार श्री. मकरंद सुगावकर यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दि.१८.१०.२००७ रोजी अर्ज करुन, सिडनॅहम कॉलेज, मुंबई येथे अपिलकार यांना सांख्यिकी विषयाचे प्राध्यापक म्हणूंन घेतले होते. परंतु त्यांना जबरदस्तीने अवैधरित्या प्राचार्यांनी काढले असल्याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कागदपत्राबाबत विषय व दिनांकासह विवक्षितपणे उल्लेख केलेला नसल्यामुळे संबंधित माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. तथापि, अपिलकाराने दि.६.७.२००७ रोजी अप्पर मुख्य सचिवांना उद्देशून पाठविलेलया पत्रासंदर्भात कार्यवाही चालू असून, सदर प्रकरणी नस्ती शासनाला सादर करण्यात येत असल्यामुळे अपिलकाराने मागणी केल्यानुसार तपासणीकरिता संबंधित नस्ती सद्यःस्थितीत उपलब्ध करुन देणे शक्य नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी

दि.१८.१.२००८ सुनावणी आयोजित केली. माहिती अधिका-यांनी अपिलकारास नस्ती क्र.एससीपी-१००३/(२३१/०३)/मशि-२ ची साक्षांकित छायाप्रत विनामूल्य अपिलकारास तात्काळ उपलब्ध करुन द्यावी असे नमूद करुन, दि.५.१.२००८ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानुसार विभागात उपलब्ध असलेल्या संबंधित नस्तीच्या छायाप्रती (१३७ पाने) विनामूल्य दि.७.२.२००८ रोजी उपलब्ध करुन दिल्या. विभागात अपिलकाराशी संबंधित सदर एकच नस्ती उपलब्ध आहे. सदर नस्ती मा.मंत्री महोदयांना निर्णयासाठी सादर केली असून, ती विभागात प्राप्त झ ााल्यानंतर अपिलकारास उर्वरित कागदपत्रांसह सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील असे अपिलकारास कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२६.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सिडनॅहम कॉलेज, मुंबई येथे अपिलकार यांना सांख्यिकी विषयाचे प्राध्यापक म्हणूंन घेतले होते. परंतु त्यांना जबरदस्तीने अवैधरित्या प्राचार्यांनी काढले असल्याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.७.२.२००८ रोजी संपूर्ण नस्ती दाखविली होती. त्यानंतरच संपूर्ण नस्तीच्या झेरॉक्स प्रती काढून अपिलकारास देण्यात आल्या. नस्ती ज्या स्थितीमूध्ये होती त्या स्थितीत नस्तीच्या छायाप्रती देण्यात आल्या आहेत. त्यामुळे नस्तीमध्ये उपलब्ध असलेले कोरे कागद त्यांना पुरविण्यात आले अथवा कागदपत्र इनडेक्स्ड / कॅटलॉग करुन अपिलकारास देण्यात आले नाहीत. अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी नस्तीवरील सर्व माहिती दिली आहे. अपिलकाराच्या तक्रारीचे मूळ कारण त्यांनी तासिका तत्वावर केलेल्या शिकविण्याचा मोबदला अर्धवेळ अधिव्याख्यात्याच्या वेतन स्वरुपात द्यावा असा आहे व ते त्यांना नियमानुसार देय नाही. विद्यापिठ अनुदान आयोगाच्या सुचनानुसार व सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार अधिव्याख्याता पदावर नियुक्तीसाठी संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी ५५% गुणांनी उत्तीर्ण व नेट/सेट अर्हता प्राप्त असणे आवश्यक आहे. अपिलकार हे सी.ए.असून पदव्युत्तर पदवी (एम.कॉम.) प्रथम श्रेणीत

उत्तीर्ण आहेत. मात्र ते नेट/सेट अर्हता धारण करीत नाहीत. अपिलकार यांनी तासिका तत्वावर शिकविण्याच्या केलेल्या कामाबाबत त्यांना देय असलेले २००४-०५ या वर्षाची रक्कम रु.२३,९८७/- मंजूर केली होती. तथापि, ती स्वीकारण्यास त्यांनी नकार दिला. त्यांनी अर्धवेळ अधिव्याख्यात्याचे वेतन द्यावे अशी मागणी केली. परंतु सेवाप्रवेश नियमानुसार त्यांची अर्धवेळ व्याख्याता म्हणून नियुक्ती करणे शक्य नाही. अपिलकाराच्या मागणीनुसार अपिलकारास वेतन अदा करता येत नाही. असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणीच्या वेळी लेखी निवेदन सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई,**
**दिनांक :-२४/१२/२००८.**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २९००/०२**

**श्री. विनोद व्ही.छोथानी,**
**१० लाढाभाई मॅन्शन,४ था मजला ,**
**१ ए, न्यू क्वीनस् रोड,(मामा परमानंद मार्ग),**
**मुंबई -४०० ००४** **------- अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, डी वॉर्ड, नाना चौक,**
**मुंबई - ४०० ००७**

**जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**(इमारती व कारखाने) बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**डी वॉर्ड, नाना चौक, मुंबई - ४०० ००७** **------ उत्तरवादी**

**-विवेचन-**

श्री. विनोद व्ही.छोथानी,मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपीलावर दिनांक १२/९/२००८ रोजी सुनावणी आयोजित केली होती. सुनावणीला अपीलकार व जनमाहिती अधिकारी उपस्थित होते.
दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर व त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर खालील बाबी स्पष्ट झाल्या.

लाढाभाई मॅन्शन या इमारतीमधील अनधिकृत व बेकायदेशीर बांधकाम हा अपीलकाराच्या माहितीचा मुख्य विषय आहे. हे सर्व बांधकाम राजधानी हॉटेलसाठी होत आहे. यासंदर्भात सुधा मिल्स प्रायव्हेट लिमी. व लालाभाई मॅन्शनच्या रहिवाश्याकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेला पाठविण्यात आलेल्या पत्रावर काय कार्यवाही करण्यात आली याची माहिती मिळण्यासाठी अपीलकाराने जनमाहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता.अपीलकाराने एकूण ४ पत्रावरील कार्यवाहीची माहिती विचारली होती.जनमाहिती अधिका-यांनी एका मुद्दयाची माहिती दिली व इतर मुद्दे आरोग्य विभागाशी संबंधित असल्यामुळे ती माहिती त्यांच्याकडून प्राप्त करून घ्यावी असे अपीलकाराला कळवले.

जनमाहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी त्यावर सुनावणी घेतली व आदेश पारित केले.

प्रथम अपीलीय प्राधिका-यांच्या आदेशातील महत्वाच्या बाबी खालीलप्रमाणे-

१. लाढाभाई मॅन्शन च्या टेरेसवरील प्लॅटफॉर्मच्या अनधिकृत बांधकामाबाबत महानगरपालिकेने कलम ३५४ ए नोटीस बजावली असून ते बांधकाम हटविण्यात आले आहे.

२. अपीलकाराची पाण्याच्या टाक्या, चिमणी इ. बाबत तक्रार होती. अपीलीय प्राधिका-यांनी अपीलकाराला दस्तऐवजाच्या स्वरूपात एखादी विशीष्ट माहिती हवी आहे का? अशी विचारणा केली. त्यावर अपीलकाराने बिल्डींगच्या ॲप्रूव्हड प्लॅनची मागणी केली. अपीलीय प्राधिका-यांनी सदर प्रत कोणाकडून मिळेल याची अपीलकाराला माहिती दिली.

३. सुनावणीदरम्यान अपीलकाराने लोड बियरींग वॉल, पाण्याच्या टाक्या, चिमणी हटवण्याबाबतची माहिती विचारली त्यावर जनमाहिती अधिका-यांनी प्लॅटफॉर्मव्यतिरिक्त इतर बांधकामावर कार्यवाही केले नसल्याचे सांगितले. फायर ब्रिगेडच्या नाहरकत प्रमाणपत्राची प्रत अपीलकाराला दाखवण्यात आली.

४. जनमाहिती अधिका-यांनी ७ दिवसाच्या आंत अनधिकृत बांधकामाबाबत कार्यवाही करून त्याची माहिती अपीलकाराला दयावी असे आदेश देण्यात आले.

५. MOH DWard यांनीही हेल्थ लायसन्सच्या उल्लंघनासंदर्भात ७ दिवसाच्या आंत कार्यवाही करून त्याबाबतची माहिती अपीलकाराला देण्याचे आदेश देण्यात आले.

अपीलकाराने व्दितीय अपील दाखल करण्यामागे जवळपास १७ कारणे दर्शवली आहेत. आयोगाने सदर बाबीचे सूक्ष्म अवलोकन केले आहे.या सर्व कारणांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की लालभाई मॅन्शनमधील पाण्याच्या टाक्यांना MHADA ने परवानगी दिली . ही परवानगी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहमतीशिवाय दिली गेली का, तसे असेल तर महानगरपालिकेने कार्यवाही का केली नाही हा अपीलकाराचा मुख्य आक्षेप असल्याचे दिसून येते.याशिवाय अपीलकाराने व्दितीय अपीलामध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने महानगरपालिकेने माहितीसंदर्भात आतापर्यंत पुरवलेल्या माहितीची कागदपत्रे पाहिली असता उपलब्ध माहिती दिली असल्याचे दिसून येते.जनमाहिती अधिका-यांनी आपल्या लेखी निवेदनात इमारतीवरील पाण्याच्या टाक्या हया सोसायटीच्या सामाईक वापरासाठी असून फक्त राजधानी हॉटेलच्या वापराकरिता नसल्याचे कळले

असे नमूद केले आहे. तथापि हे बांधकाम अनधिकृत आहे की अधिकृत आहे याचा उपलब्ध पूर्ण कागदपत्रामध्ये कोठेच उल्लेख नाही. बांधकाम अधिकृत आहे की अनधिकृत आहे हे ठरवणे , त्यावर कार्यवाही करणे इ. बाबत निर्देश देणे आयोगाच्या कक्षेतील बाब नसली तरी हे बांधकाम अधिकृत आहे की अनधिकृत याबाबत अपीलकाराला उपलब्ध स्पष्ट माहिती कळणे आवश्यक आहे असे आयोगाचे मत आहे. पाण्याच्या टाक्यांना MHADAने परवानगी दिली असल्यास त्यास महापालिकेची सहमती असल्यास त्याचे कागदपत्र या तसेच अनुषंगिक बाबींचा सांगोपांग परामर्श घेउन सदर बांधकाम अनधिकृत आहे किंवा कसे याबाबतचे उपलब्ध संबंधित दस्तऐवज हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत अपीलकाराला उपलब्ध करून दयावेत असे आदेश देण्यात येत आहेत.

याखेरीज अपीलकाराच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने इतर उपलब्ध माहिती देण्यात आलेली असल्यामुळे सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>निर्णय</u>**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक २९/१२/२००८**

**मा.मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २९८१ /०२**

**श्री.रविंद्रकुमार दोशी,**
**बी-५०३,रिद्धी सिद्धी अपार्टमेंट,**
**प्लॉट नं.६९, सेक्टर २१ , खारघर,**
**नवी मुंबई- ४१० २१०** ------- **अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा**
**पोलीस उपायुक्त (प्रतिबंधक),**
**शिवाजी मंडई,पोलीस आयुक्तांचे कार्यालय,**
**मुंबई- ४०० ००१**

**जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**गुन्हे, पोलीस आयुक्तांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई-४०० ००१.** ------**उत्तरवादी**

## -विवेचन-

श्री. रविंद्रकुमार दोशी ,मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपीलावर दिनांक २६.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. माहिती आर्थिक गुन्हे शाखेशी संबंधित असल्यामुळे सदर शाखेचे अधिकारी सुनावणीला उपस्थित होते. अपीलकार व प्रथम अपीलीय प्राधिकारी उपस्थित नव्हते. तथापि अपीलकाराने आयोगाकडे लेखी निवेदन सादर केलेले आहे.

उपस्थिताचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर तसेच अपीलकाराचा व्दितीय अपीलाचा अर्ज व त्यांनी सादर केलेले लेखी निवेदन व उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर सदर प्रकरणाच्या खालील बाबी स्पष्ट झाल्या.

दिनांक २५/७/२००५ रोजी मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल अपील क्रमांक ५६०/०५ मध्ये फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीबाबत तसेच अपीलकाराविरूद्ध दाखल करण्यात आलेल्या गुन्हयाच्या अनुषंगाने काही माहिती मिळण्यासाठी जनमाहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज केला होता. जनमाहिती अधिकाऱ्यांनी सदर

माहिती गुन्हे शाखेशी प्राप्त असल्यामुळे त्यांच्याकडून माहिती मागवून प्राप्त माहिती अपीलकाराला दिली. तथापि अर्जदाराविरूद्ध दाखल करण्यात आलेल्या गुन्हयाच्या अनुषंगाने काही माहिती अधिनियमातील कलम ८(ख)(ज)(त्र) अन्वये जनमाहिती अधिकाऱ्यांनी नाकारली. तसेच काही माहिती प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने अर्जदाराने ती माहिती मिळण्यासाठी मा. न्यायालयाला विनंती करावी असे अपीलकाराला कळवले. अपीलकाराच्या व्दितीय अपीलात नमूद केल्यानुसार त्यांनी प्रथम अपील दोन वेळा प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांकडे पाठवले मात्र दोन्ही वेळा ते स्वीकारले गेले नाही. त्यामुळे त्यांनी आयोगाकडे थेट व्दितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकाराने आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपीलाच्या कारणांचा संक्षिप्त आशय खालीलप्रमाणे माहिती अर्जामध्ये नमूद प्रकरणाचा /गुन्हयाचा तपास पूर्ण झाला आहे आणि अंतिम अहवाल संबंधित न्यायालयात दाखल करण्यात आला आहे. जनमाहिती अधिका-यांनी कलम ८ ची तरतूद लागू करणे चूकीचे आहे. तपास अधिका-यांनी काही आवश्यक माहिती अंतिम अहवाल सादर करताना दडवली आहे.त्यामुळे जनमाहिती अधिकारी माहितीचे चूकीचे वर्गीकरण करून माहिती नाकारत आहेत. काही माहिती प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने अपीलकाराने ती मा. न्यायालयाकडून घ्यावी असे अपीलकाराला कळविले आहे. जनमाहिती अधिका-याच्या कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे ती देणे जनमाहिती अधिका-यावर अधिनियमातील तरतूदीनुसार बंधनकारक आहे. मागितलेली माहिती जनमाहिती अधिका-याच्या कार्यालयात असल्याने ती जनमाहिती अधिका-यांनी देणे बंधनकारकच आहे. संबंधित अधिका-यांकडून बरीचशी कागदपत्रे मा. न्यायालयात सादर झालेली नाहीत व ती कोर्ट केस नं. १४३/PW /०५ चा भाग नाहीत. ही सर्व कागदपत्रे जनमाहिती अधिकारीच फक्त देउ शकतात.

आयोगाने वर नमुद केलेल्या कारणाचा व उपलब्ध कागदपत्रांचे सूक्ष्म अवलोकन केले आहे. या सर्व प्रकरणाची पार्श्वभूमी खालीलप्रमाणे असल्याचे दिसून येते.

फिर्यादीने दिलेल्या जबाबानुसार अमेरिकेतील एका कार्यालयाचे पीडीएफ टू डॉक कन्हवर्जनचे काम सिंगापूर येथील मे. विराणा प्रा.लि. या कंपनीला मिळाले होते. हे काम मुंबई येथील एसटीपी सॉफटवेअर इंडिया प्रा. लि. यांच्याकडे अपीलकारामार्फत देण्यात आले. सदर कामाच्या अनुषंगाने दोघांमध्ये MOU व नंतर अपीलकार व मे. विराणा प्रा.लि. आणि एसटीपी सॉफटवेअर इंडिया कं यांच्यामध्ये मुख्य करार झाला. करारामध्ये मिळणारी आगावू रक्कम, दयावी लागणारी बँक गॅरंटी इ. अनुषंगिक बाबीचा समावेश होता. काम मिळवून दिल्याबद्दल अपीलकाराला एसटीपी सॉफटवेअर इंडिया

कं. कडून कमिशन दयावे लागणार होते. त्याप्रमाणे कमिशनपोटी कंपनीने अपीलकाराला काही रक्कम दिली. तथापि करण्यात आलेले सर्व करार बनावट असल्याचे कंपनीला आढळून आल्याने कंपनीने अपीलकाराविरूद्ध फसवणूकीचा गुन्हा दाखल केला.

पोलीसांनी तपास पूर्ण करून सदर प्रकरणात अपीलकाराविरूद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या प्रकरणात आणखी इतर ३ कंपन्याचा उल्लेखही आलेला आहे.

तथापि आयोग सदर प्रकरणी गुन्हयाचा तपास , मा. न्यायालयाला दाखल करण्यात आलेला अंतिम अहवाल इ.बाबत तपशीलात न जाता सदर प्रकरणी माहितीच्या दृष्टीने आपले लक्ष केंद्रित करत आहे.

जनमाहिती अधिका-यांनी नाकारलेल्या माहितीचा संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे

CR ४१/२००५ नोंद करताना तक्रारदाराने/ फिर्यादीने सादर केलेल्या सर्व तक्रारी, दस्तऐवज, स्टेटमेंटस ची माहिती. CR ४१/२००५ ची नोंद करण्यास मंजूरी मिळण्यासाठी सादर करण्यात आलेल्या कार्यालयीन टिप्पणीची प्रत,बॅकेच्या खात्यातील १९.०० कोटी या रक्कमेच्या संदर्भातील EOW कडून वेगवेगळया न्यायालयाला सादर करण्यात आलेली कागदपत्रे .।ा. उच्च न्यायालयाने दिनांक २८/६/२००५ च्या आदेशामध्ये सकृतदर्शनी सीआर नं. ४१/२००५ मध्ये फसवणूक झाल्याचे दिसून येत नाही. असे नमूद केले आहे. या विधानाबद्दल सहआयुक्त(गुन्हे) व सहआयुक्त(EOW) यांना माहिती करून देण्यात आली आहे का?

सदर प्रकरणी तपास पूर्ण झाला आहे व प्रकरण मा. न्यायालयात दाखल झाले आहे.त्यामुळे या ठिकाणी कलम ८(ज) ही तरतूद लागू होत नाही. असे आयोगाचे मत आहे.कलम ८(त्र) ची तरतूदही लागू होण्याचे काही कारण दिसत नाही . कारण जरी माहिती उघड केल्याने व्यापक जनहित साधले जाणार नसले तरी अपीलकाराविरूद्ध सदर प्रकरण आहे आणि ही माहिती दिल्याने अपीलकाराची त्याच्यावर अन्याय होत आहे, ही भावना दूर होण्यास मदतच होणार आहे. तसेच ही माहिती कोणाच्या खाजगी जीवनात आगंतुक हस्तक्षेप करील अशी नाही कारण यामध्ये अपीलकाराविरूद्धच गुन्हा दाखल झालेला आहे व अपीलकाराच्या म्हणण्यानुसार ती त्याला त्याचे निरपराधित्व सिद्ध करण्याच्या दृष्टीने सहाय्यक होणार आहे. सदर मागितलेली माहिती दिल्याने कोणत्याही व्यक्तिच्या खाजगी जीवनात हस्तक्षेप होईल असे आयोगाला वाटत नाही. त्याचप्रमाणे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने अपीलकाराने माहिती मा.न्यायालयाकडून घ्यावी असे म्हणणेही योग्य नाही.जी माहिती मा.न्यायालयाला सादर करण्यात आली

त्याची कार्यालयामध्ये कार्यालयीन प्रत उपलब्ध असणे सहज स्वाभाविक गोष्ट आहे. त्यामुळे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती जनमाहिती अधिका-यांनी देणे अपेक्षितच आहे.

नाकारलेली माहिती दिल्याने वा उघड केल्याने जनमाहिती अधिका-यांनी कलम ८(ख ) प्रमाणे मा.न्यायालयाचा अवमान होतो किंवा कसे तसेच ती प्रकट करण्यास न्यायालयाने मनाई केली आहे का याबाबींची जनमाहिती अधिका-यांनी व प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी शहनिशा करावी व तसे होत असल्यास याबाबत सकारण आयोगाला व अपीलकाराला हे आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसाच्या आंत लेखी कळवावे. अन्यथा अपीलकाराने विचारलेली माहिती अपीलकाराला १५ दिवसांच्या आंत उपलब्ध अभिलेखावरून पुरवावी असे आदेश देण्यात येत आहेत.

## निर्णय

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक-२९ /१२/२००८.**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २८६८ /०२**

**श्री.देवेंद्र विजय एम दडवाल,**
**कॉन्हेंट व्हिला, जे.पी.रोड, अंधेरी (प),**
**मुंबई -४०० ०६१** **----- अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा } चेअरमन, वर्सोवा एज्युकेशन ट्रस्ट,**
**जनमाहिती अधिकारी तथा } वर्सोवा वेल्फेअर हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज,**
**सात बंगला, अंधेरी (प), मुंबई -४०० ०६१ ---- उत्तरवादी**

## -विवेचन-

श्री.देवेंद्र विजय एम दडवाल,मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपीलावर दिनांक१५/९/२००८ रोजी सुनावणी आयोजित केली होती. सुनावणीला अपीलकार उपस्थित होते. उत्तरवादी उपस्थित नव्हते.

अपीलकाराने वर्सोवा एज्युकेशन ट्रस्टच्या झालेल्या सभेच्या इतिवृत्तांच्या प्रती,संस्थेने सिटी सिव्हिल कोर्टात दाखल केलेल्या सुट ची प्रत,अपीलकाराच्या विरुद्ध करण्यात आलेल्या तक्रारीच्या प्रती अशा एकंदर २० मुद्दयांची माहिती मिळण्यासाठी जनमाहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता. जनमाहिती अधिका-यांनी माहिती न दिल्यामुळे तसेच प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी प्रथम अपीलाची दखल न घेतल्याने अपीलकारांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता संस्थेकडून वा जनमाहिती अधिका-यांकडून किंवा प्रथम अपीलीय प्राधिका-यांकडून अर्जदाराशी उत्तरादाखल कोणताही पत्रव्यवहार केलेला दिसून येत नाही. उत्तरवादी सुनावणीलाही उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे

नेमक्या कोणत्या कारणांमुळे सदर प्रकरणी माहिती देण्यात आली नाही, हे समजून येत नाही. आयोगाकडे सदर संस्थेने काही लेखी खुलासाही सादर केलेला नाही.

या पार्श्वभूमीवर जनमाहिती अधिका-यांनी/ संस्थेने माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती का पुरवली नाही, याबाबत लेखी खुलासा दिनांक १४.१.२००९ रोजी अध्यक्ष, वर्सोवा एज्युकेशन ट्रस्ट यांनी आयोगास स्वतः येऊन सादर करावा.

**आदेश**

**वरील आदेशाचे पालन करण्यांत यावे.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक-२९ /१२/२००८.**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २८४० /०२**

**श्री.सौमिल ए.पटेल,**
**५४, एच.के.हाउस,**
**आश्रम रोड, अहमदाबाद,- ३८०००९ (गुजराथ) ----- अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला,गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा (पूर्व) मुंबई - ४०० ०५१.**

**जनमाहिती अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला,गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा (पूर्व) मुंबई - ४०० ०५१ -------उत्तरवादी**

**-विवेचन-**

श्री.सौमिल ए.पटेल, अहमदाबाद (गुजराथ) यांनी केंद्रीय माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अपील दाखल केले होते. सदर अपील राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्रातील असल्यामुळे पुढील कार्यवाहीसाठी राज्य माहिती आयोगाकडे पाठवले. सदर अपीलावर दिनांक २/९/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीला अपीलकार उपस्थित नव्हते. जनमाहिती अधिकारी उपस्थित होते.

उपलब्ध कागदपत्रावरून असे दिसून येते की, याच विषयासंदर्भात अपीलकाराच्या अपीलावर(अपील क्रमांक ६०९/०२) राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांनी निर्णय दिला आहे. सदर निर्णयाचे व संबंधित बाबींचे अवलोकन केले असता असे दिसून येते

की, आता विचाराधीन अपीलाचा विषयही तोच आहे. वर नमूद अपीलावर राज्य माहिती आयुक्त यांनी अपीलकाराला जनमाहिती अधिका-यांनी संबंधित कागदपत्रे तपासणी करता उपलब्ध करून दयावीत व अपीलकारांनी त्यानंतर आवश्यक त्या कागदपत्रांची मागणी केल्यानंतर आवश्यक ते शुल्क आकारून अपीलकाराला ती उपलब्ध करून दयावीत असे आदेश दिले आहेत. अपीलाचा विषय एकच असल्यामुळे सदर प्रकरणाचा पुन्हा  वेगळयाने उहापोह करण्याची आवश्यकता नाही. वर नमूद पद्धतीने अपीलकाराने माहिती प्राप्त करून घ्यावी व त्याप्रमाणे जनमाहिती अधिका-यांनी ती अपीलकाराला उपलब्ध करून दयावी.

**निर्णय**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक २९ /१२/२००८**

**मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/३२२०/०२**

**श्री. अनिल पांडुरंग घाडी,** **------ अपीलकर्ता**
**महाराष्ट्र झोपडी संघ, १,**
**जी.डी.आंबेडकर मार्ग, परेल, मुंबई- ४०० ०१२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन. २ रा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन. २ रा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी**

**-वि वे च न -**

श्री. अनिल पांडुरंग घाडी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनयम, २००५ अंतर्गत कलम १९ (३) अन्वये दाखल केलेल्या द्वितीय अपिलावर दि.२२.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली होती. सुनावणीकरिता अपिलकार व उत्तरवादी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते.

अपिलकाराने सायन येथील ट्रान्झिट कॅम्पच्या भाडयापोटी केलेल्या रु.५०,०००/-च्या प्रदानाच्या अनुषंगाने काही माहिती मिळण्यासाठी जन माहिती अधिका-यांकडे अर्ज केला हाता. जन माहिती अधिका-यांनी माहिती न दिल्याने व प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित न केल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सुनावणीला अपिलकार व उत्तरवादी उपस्थित नसल्यामुळे त्यांचे म्हणणे समजून घेता आले नाही. तथापि, उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलकाराला माहिती प्राप्त झाल्याचे दिसत नाही.

सबब, हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**१५ दिवसांचे आंत अपिलकारास माहिती देण्यांत यावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई.**
**दिनांक :-३१/१२/२००८.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/३१४२/०२**

**श्री. अनिल पांडुरंग घाडी,** **------ अपीलकर्ता**
**महाराष्ट्र झोपडी संघ-१, जी.डी.आंबेडकर मार्ग,**
**परेल, मुंबई- ४०० ०१२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन अधिकारी,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन अधिकारी,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी**

## -वि वे च न -

श्री. अनिल पांडुरंग घाडी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनयम, २००५ अंतर्गत कलम १९ (३) अन्वये दाखल केलेल्या द्वितीय अपिलावर दि.१७.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली होती. सुनावणीकरिता अपिलकार व उत्तरवादी हजर होते.

अपिलकाराने खापरीदेव सहकारी गृहनिर्माण सोसायटी संदर्भातील एस.आर.ए.स्कीमच्या अनुषंगाने एल.ओ.आय.ला मान्यता देताना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने लावलेल्या अटी व शर्तीच्या अनुषंगाने काही माहिती मिळण्यासाठी जन माहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता. जन माहिती अधिका-याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित न केल्याने अपिलकाराने आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणीच्यावेळी अपिलकाराने द्वितीय अपिलात उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने सविस्तर खुलासा, मुद्देनिहाय स्पष्टीकरण व संबंधित कागदपत्राच्या छायांकित प्रती आयोगाला सादर केल्या व सदर माहिती अपिलकाराला देण्याची तयारी दर्शविली. तथापि, माहिती अर्ज दाखल केल्यानंतर व

प्रथम अपील दाखल केल्यानंतर जन माहिती अधिका-याकडून व प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडून त्या त्या वेळी माहिती का देण्यात आली नाही याचा खुलासा होत नाही. सबब, हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दयावी. तसेच, विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे जन माहिती अधिका-यावर उक्त अधिनियमातील कलम-२० अनुसार शास्ती का लावण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी १० दिवसांच्या आत आयोगाला सादर करावा. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी प्रथम अपिलावर आदेश कां पारित केले नाहीत याबाबतचा खुलासा त्यांनी आयोगाला व्यक्तिशः येऊन सादर करावा.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई.**
**दिनांक :-२९/१२/२००८.**